



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २०१ * नांदेड * गुरूवार, दि. ३० जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# लोकसभेत पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदा मंजूर

## पेपरफुटीच्या गुन्ह्यात ७ वर्षांचा तुरुंगवास अन् १० कोटींच्या दंडाची तरतूद




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशात वारंवार उघडकीस येणाऱ्या पेपरफुटीच्या घटना आणि परीक्षांमधील गैरप्रकारांना कायमचा आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने एक मोठे आणि कठोर पाऊल उचलले आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत मांडलेले 'सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकार प्रतिबंधक) सुधारणा विधेयक, २०२६' बुधवारी आवाजी मतदानाद्वारे मंजूर करण्यात आले आहे.

या नव्या आणि सुधारित कायद्यानुसार, आता पेपरफुटी आणि परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या गुन्हेगारांना ७ वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि तब्बल १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत उघडकीस आलेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर विद्यमान 'सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४' अधिक सक्षम करण्यासाठी हे दुरुस्ती विधेयक आणण्यात आले होते, ज्यावर लोकसभेने शिक्कामोर्तब केले.

या कायद्याअंतर्गत परीक्षेशी संबंधित कुठलेही गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तींना आता किमान ५ वर्षे ते कमाल १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागेल. पूर्वी ही शिक्षा ३ ते ५ वर्षांपर्यंत होती.

### 'वंदे मातरम'चा अपमान करणे आता गुन्हा ठरणार! विधेयक मंजूर

राज्यसभेने बुधवारी 'राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंध (दुरुस्ती) विधेयक २०२६' मंजूर केले. या दुरुस्तीमुळे 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला राष्ट्रगीत 'जन गण मन' प्रमाणेच कायदेशीर संरक्षण मिळणार आहे. या कायद्याअंतर्गत राष्ट्रीय गीताचा जाणूनबुजून अपमान करणे किंवा त्याच्या गायनात अडथळा निर्माण करणे हा दंडनीय गुन्हा ठरणार असून, दोषी आढळल्यास कमाल ३ वर्षांचा कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी सांगितले की, हा बदल केवळ कायद्यातील दुरुस्ती नसून भारताची राष्ट्रीय चेतना, सांस्कृतिक परंपरा, स्वातंत्र्यलढ्याचे आदर्श आणि देशाच्या आत्म्याप्रती असलेली सामूहिक बांधिलकी अधोरेखित करणारा आहे.या दुरुस्तीमुळे राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ चा विस्तार करण्यात आला आहे. यापूर्वी या कायद्यांतर्गत राष्ट्रीय ध्वज, भारतीय राज्यघटना आणि राष्ट्रगीत 'जन गण मन' यांना कायदेशीर संरक्षण होते. आता त्यात 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचाही समावेश करण्यात आला आहे.

# राज्यात पुढील दोन दिवस पावसाचा जोर वाढणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या एका कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत ३१ जुलैपर्यंत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. या कालावधीत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. या कालावधीत विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशमध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

तुलनेत मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या दक्षिण भागात कमी पावसाची शक्यता आहे. सध्याच्या हवामान अंदाजानुसार, कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव प्रामुख्याने विदर्भात, विशेषतः पूर्व विदर्भात जाणवण्याची शक्यता आहे. ३० जुलै रोजी त्याचा प्रभाव पश्चिम विदर्भ, खानदेश, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि कोकणात अधिक जाणवू शकतो. ३१ जुलै रोजी खानदेशातील काही भाग तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात पावसाचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे.

# मनोज जरांगे यांचे २९ ऑगस्टपासून पुन्हा उपोषण

## राज्यात ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या, पण सरकार प्रमाणपत्र देत नसल्याचा आरोप



**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी बोलताना म्हटले की, मराठ्यांना वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. कधी काळी समाज एकवटला त्यामुळे आपल्याला काळजीपूर्वक पुढं जायचं. २९ ऑगस्टला ३ वर्ष पूर्ण होत आहेत. आपल्याला जर कोणी वेड्यात काढत असेल त्यामुळे तुम्हाला बोलावलं. २९ ऑगस्ट रोजी पुन्हा शेवटचं निर्णयक आंदोलन करणार आहे. मनोज जरांगे पाटील यांची अंतरवालीतून घोषणा केली. त्यांनी थेट पुन्हा शेवटच्या आंदोलनाची घोषणा केली.

पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, समाजातील लेकरांचं हाल होत आहे, गेल्या तीन वर्षांपासून रक्त जळतोय म्हणून समाजाच्या लेकरांसाठी शेवटचा निर्णायक आंदोलन करणार आहे. एकानेही घरी थांबायचं नाही, ५८ लाख नोंदीचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय सोडायचं नाही. हैद्राबाद गॅझेटीयर दिलं तर मग प्रमाणपत्र का दिलं नाही. मराठ्यांना टार्गेट कश्यामुळे करता, आधी तुम्ही स्थानिक चौकशी अहवाल आणला. आता तुकडा पडल्याशिवाय राहणार. हैद्राबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र घेतल्याशिवाय आता थांबणार नाही. २९ ऑगस्टपासून जोपर्यंत आंदोलन चालणार आहे, तो पर्यंत वेळ द्या. सर्वपक्षीय नेत्यांच्या मुलांना आरक्षण लागणार आहे. २८ ऑगस्टपर्यंत हैद्राबाद गॅझेट नुसार प्रमाण पत्र द्या, असा अल्टीमेटम जरांगे पाटील यांचा सरकारला दिला आहे.

समाजाला वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. आपल्याला २९ ऑगस्टला शेवटचं खूप मोठ निर्णायक आंदोलन करायचं आहे, आपल्या ५८ लाख नोंदी राज्यात सापडल्या. त्यांना वारंवार सांगतो त्यांचे प्रमाणपत्र द्या. सरकार नोंदी प्रमाणे प्रमाणपत्र देत नाही म्हणून आंदोलन करण्यात येणार आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांनी अर्ज दाखल करा. तीन वर्ष समाजाच्या कल्याणासाठी रक्त जळतोय. मला निर्णायक शेवटच आंदोलन करायचे आहे. एक तर ते जातील नाहीतर मी जाईल. २९ ऑगस्ट ला कोणीही घरी थांबायचे नाही. आपल्याला हैदराबाद गॅझेट दिले, प्रमाणपत्र कधी द्यायचे. सरकारला प्रश्न करत जरांगे म्हणाले, हैदराबाद गझेटीयर दिले, प्रमाणपत्र कधी देता? फडणवीस साहेबांनी मराठ्यांची लेकरं टार्गेट केले, असंही पुढे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# लोकसभेत दुसऱ्या दिवशीही प्रचंड गदारोळ, सभागृहाचे कामकाज तहकूब

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सध्या संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. दरम्यान बुधवारी लोकसभेत प्रचंड गदारोळात आणि विरोधकांच्या घोषणाबाजीत 'पब्लिक एक्झामिनेशन्स (अन्फेअर मीन्स) अमेंडमेंट बिल, २०२६' (अँटी पेपर लीक सुधारणा विधेयक) मंजूर करण्यात आले. लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी अँटी पेपर लीक सुधारण विधेयक मंजूर झाल्याची घोषणा केली. यानंतर, लोकसभेत गदारोळ झाला व लोकसभेचे कामकाज ३० जुलै सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले आहे.

महत्वाचे म्हणजे, संसदेत पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात साधारणपणे दोन दिवस चाललेल्या चर्चेनंतर हे विधेयक ध्वनिमताने मंजूर करण्यात आले. यापूर्वी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी आणि विरोधकांच्या काही विधानांमुळे संसदेत सत्ताधारी तथा विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी बघायला मिळाली.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत हे विधेयक मांडले. दरम्यान त्यांनी विराधेकांच्या भुमिकेवर आक्षेप घेत, थेट हल्ला चढवला. ते म्हणाले, विरोधी पक्षाचे वर्तन अत्यंत निराशाजनक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वचनबद्धता दर्शवणाऱ्या, अशा या गंभीर आणि महत्त्वाच्या विधेयकावर विधायक सूचना देण्याऐवजी, विरोधी पक्ष केवळ राजकारण करत आहे. विरोधी पक्षनेत्यांनी वापरलेली भाषा अत्यंत असंसदीय आहे. ती भाषा एवढी अयोग्य होती की, मी तिचा पुन्हा उल्लेखही करू इच्छित नाही. जे कोणी स्वतःला सुशिक्षित आणि संसदीय संकेतांचे जानकार समजतात, त्यांना हे माहित असायला हवे की, सभागृहात अशी भाषा वापरली जाऊ शकत नाही, असे ते म्हणाले.

# नांदेड जिल्ह्यातील रूग्णालयात घोटाळे: मांडवीत ३.२० कोटींचा अपहार

## वैद्यकीय अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

**किनवट (प्रतिनिधी)–** सेवार्थ प्रणालीत चुकीच्या पद्धतीने माहिती नोंदवून बेसिक व एरीयर्स थकबाकीपोटी तब्बल ३ कोटी २० लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी मांडवीच्या कै. बळीराम पाटील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.विक्रम राठोड यांच्याविरुद्ध मांडवी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किनवट तालुक्याच्या मांडवी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.एन.जी. लोकडे हे सेवानिवृत्त झाल्याने वैद्यकीय अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार आहरण व संवितरणसह अधिकारी म्हणून डॉ. विक्रम दासराम राठोड वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१ मे २०२३ पासून सुपूर्द करण्यात आला होता. डॉ. राठोड हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून शासकीय रक्कम कोषागारातून काढून त्या रकमेचे संवितरण करीत होते. मांडवी येथील वैद्यकीय अधीक्षक पद वर्ग – १ दर्जाचे असल्यामुळे उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर यांच्याकडून वेतन व इतर लेखा शीर्षाकरीता निधीची मागणी होत होती. उपसंचालक यांच्याकडून वैद्यकीय अधीक्षक यांच्या बीडीएस प्रणालीवर थेट निधी उपलब्ध करून दिला जातो, प्राप्त निधीचे आहरण व सवितरण अधिकारी म्हणून डॉ.राठोड हे कोषागारात देयके सादर करून संबंधितांना निधी वितरीत करीत होते.




जिल्हा कोषागार अधिकारी यांच्या पत्रानुसार ग्रामीण रुग्णालय मांडवी येथील आहरण व सवितरण अधिकारी यांच्या लॉगिनमधील जुन्या सेवार्थ प्रणालीतून नवीन सेवार्थ प्रणालीत डेटा मायग्रेशन करताना चुकीच्या पद्धतीने वेतनाची नोंद सेवार्थ प्रणाली नोंदीतून उपकोषागार कार्यालयात देयक सादर करून जून २०२४ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत बेसिक एरियस थकबाकी पोटी ३ कोटी २० लाख ९९ हजार ९५३ रुपये उपकोषागार कार्यालय, किनवट येथून स्वतःच्या फायद्यासाठी आहरीत करून स्वतःच्या खात्यावर वर्ग केली. ही बाब उघड झाल्यानंतर उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर यांच्यामार्फत सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली होती. त्यात डॉ. राठोड हे दोषी आढळून आल्याने जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी डॉ. राठोड यांच्याविरुद्ध मांडवी पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी डॉ.विक्रम राठोड यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# निकृष्ट बांधकामामुळे पुलाची भिंत कोसळली!

## आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांची गडकरींकडे कठोर कारवाईची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ (तुळजापूर- बुट्टी बोरी) वरील शहरातील लोहा- नांदेड मार्गाखंडात विष्णुपुरी गावाजवळील वाहन अंडरपासच्या पुलाची भिंत कोसळल्याच्या गंभीर घटनेची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करण्यात यावी. तसेच निकृष्ट दर्जाच्या कामासाठी जबाबदार असलेल्या M/s KTIL या बांधकाम संस्थेविरुद्ध कठोर कारवाई करून तिला तात्काळ काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

आ. बोंढारकर यांनी दिल्लीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन यासंदर्भात निवेदन सादर केले. निवेदनात त्यांनी म्हटले की, सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये दर्जाहीन काम होत आहे. विष्णुपुरी येथील अंडरपासच्या पुलाची भिंत कोसळल्याने बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. यावेळी आ. बोंढारकर यांनी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्ते व पुलांच्या कामांना केंद्रीय मार्ग निधी (सीआरएफ) योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी केली.

यासह प्रमुख जिल्हा मार्ग (एमडीआरठ–२८) वरील कारखाना– सायाळ– पारडी पोखर– भोसी मार्गावर कि.मी. ०/५०० ते १/५०० दरम्यान नवीन पुलाचे बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग–३६१ ते मुसलमानवाडी– पिपळगाव– शेवडी– धानोरा– माळाकोळी मार्गावरील भनगी गावाजवळ मोठ्या पुलासह जोडरस्त्याचे बांधकाम, मुसलमानवाडी– जुना कल्हाळ– विष्णुपुरी– पांगरी– असवदन– गोपालचावडी– किकी– राहेगाव (एमडीआर–२९) या मार्गाचे सुदृढीकरण तसेच किकी गावाजवळ मुख्य पूल व जोडरस्त्याचे बांधकाम या सर्व विकासकामांना मंजुरी मिळाल्यास नांदेड दक्षिण मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुरक्षित, वेगवान आणि सुलभ होईल. तसेच शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास आ. आनंदराव बोंढारकर यांनी व्यक्त केला.




# हदगाव उपजिल्हा रुग्णालयातही ४४.१२ लाखांचा अपहार; सहायक अधीक्षकावर गुन्हे दाखल

## बेसिक एरियर्सच्या नावाने वळवले पैसे

**नांदेड (प्रतिनिधी)–** किनवट प्रमाणेच हदगाव रूग्णालयातही घोटाळा झाला असून येथील उपजिल्हा रुग्णालयातील सहायक अधीक्षक संतोष सोपान दरगू यांनी बेसिक एरियर्स थकबाकीच्या नावाने ४४ लाख १२ हजार ५०० रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघड झाला आहे. अंतर्गत तपासणीत ही बाब लक्षात येताच वैद्यकीय अधीक्षक डॉ. संदीप दरबस्तवार यांनी संबंधितांकडून रक्कम परत वसूल केली असली, तरी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात दि. २८ जुलै रोजी उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

हदगाव उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असले सहायक अधीक्षक तथा वरिष्ठ लिपिक डॉ. संतोष सोपान दरगू यांनी फेब्रुवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीतील बेसिक एरियर्स थकबाकी पोटी ४४ लाख १२ हजार ५०० रुपये जास्तीचे दाखवून ती रक्कम स्वतःच्या खात्यात वळती करून घेतली. ही बाब अंतर्गत तपासणीत लक्षात येताच वैद्यकीय अधीक्षक डॉ. संदीप हनुमंतराव दरबस्तवार यांनी दरगू यांच्याकडून सदर रक्कम परत वसूल करून शासकीय खात्यात जमा करून घेतली. त्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या तपासणीत हा प्रकार पुन्हा निदर्शनास आला. त्यानुसार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय माणिकराव पेरके यांनी हदगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलीसांनी गुन्हा दाखल केला.

विशेष म्हणजे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संदीप दरबस्तवार यांनी देयकांवर पुरेशी तपासणी न करता सह्या केल्यामुळे त्यांना देखील या प्रकरणात सह–आरोपी करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे हे करीत आहेत.




# अज्ञात वाहनाने दुचाकीला उडवले; एक ठार, एक गंभीर

## रात्री दहाच्या सुमारास अपघात

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** अर्धापूर-तामसा रोडवर लहान शिवारात अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक झाली. या अपघात एक ठार तर एक गंभीर जखमी झाला आहे.

अर्धापूर-तामसा रोडवर लहान शिवारात बुधवार, दि.२९ जुलै रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास अज्ञात वाहनाची दुचाकीला लागली. या धडकेत पांडूरंग बाबुराव खूपसे (४०) यांचा जागीच मृत्यू झाला तर यशवंता चंपती डवरे (३८) हे गंभीर जखमी झाले आहेत. जमादार संजय घोरपडे, बिचके व महामार्ग पोलीस कर्मचारी व सेवक वसंत सिनगारे यांनी जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे.

# विद्यार्थ्यांचा पोषण आहार सकस आणि दर्जेदारच हवा

## एफडीएकडून राज्यातील शाळांच्या मध्यान्ह आहार योजनेची तपासणी होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या दोन महिन्यांपासून अन्न आणि औषध प्रशासनाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात कारवाईचा बडगा उगारल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता शाळा आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे मोर्चा वळवला आहे. महाराष्ट्रातील शाळांमध्ये मिळणारा मध्यान्ह आहार, वसतिगृह आणि कँटीनमधील आहार पूर्णपणे सुरक्षित, सकस आणि न्यूट्रिशनयुक्त असावा, यासाठी 'सेव्ह फूड फॉर एव्हरी चाइल्ड इन महाराष्ट्र' ही मोहीम लागू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पत्रकार परिषदेत माहिती देताना तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले की, राज्यातील १ लाखांहून अधिक शाळांमध्ये २ कोटींहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि चांगल्या गुणवत्तेचा आहार मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

### आजवर किती मंत्र्यांच्या आस्थापनांवर धाड टाकली, उच्च न्यायालयाची तुकाराम मुंढेंच्या एफडीएला विचारणा

राज्यात गेल्या काही महिन्यात एफडीएने कारवाईचा धडाका लावला असून अगदी पान टपऱ्यांपासून ते पंचतारांकीत हॉटेलपर्यंतच्या आस्थापनांवर कारवाई केली आहे. त्याच अनुषंगाने नवी मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेलचा परवाना रद्द केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएचे कान टोचले आहेत. खासगी आस्थापनांवर कारवाईचा धडाका लावणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाई पद्धतीवरच मुंबई उच्च न्यायालयाकडून सवाल उपस्थित करण्यात आले. केवळ खासगी आस्थापनांवरच कठोर कारवाई नको अशा सूचनाही मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएला दिल्या. तसेच, आजवर किती मंत्र्यांच्या आस्थापनांवर आणि सरकारी आस्थापनांवर छापे टाकले, असे म्हणत मंत्र्यांच्या मालकीच्या आस्थापनांची तपासणी करण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने एफडीएला दिले आहेत.

# ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमारचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलला रामराम



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमार ज्युनियरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तो आता ब्राझीलकडून खेळणार नाही. या ३४ वर्षीय फुटबॉलपटूने आपल्या संघासाठी सातत्याने चांगली कामगिरी केली. पण त्याला विश्वचषक जिंकण्यात अपयश आले. निवृत्तीची घोषणा केल्यानंतर तो आता भावूक झाला आहे.

नुकत्याच संपन्न झालेल्या फिफा विश्वचषक २०२६ मध्ये ब्राझीलच्या संघाने चांगली कामगिरी केली नाही. स्पर्धेसाठी एक प्रबळ दावेदार मानला जाणारा हा संघ अव्वल चारमध्ये स्थान मिळवू शकला नाही. स्पर्धे दरम्यान नेमारला दुखापतीचाही सामना करावा लागला, ज्यामुळे तो बराच काळ बेंचवर बसून होता. त्याने आता आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे, पण तो क्लबसाठी खेळणे सुरू ठेवेल.नेमारने स्पष्टपणे सांगितले, राष्ट्रीय संघासोबतचा माझा काळ संपला आहे. मी पिवळ्या जर्सीसाठी घाम गाळला, इतिहास घडवला आणि नेहमीच माझ्या देशासाठी लढलो. मला आता खेळायचे नाही. नेमार हा ब्राझीलचा आतापर्यंतचा सर्वाधिक गोल करणारा फुटबॉलपटू आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आत्महत्यांचे प्रमाण का वाढतेय?

मानवी जीवन ही निसर्गाने दिलेली सर्वांत अमूल्य देणगी आहे. प्रत्येक व्यक्तीचे अस्तित्त्व अर्थपूर्ण असते आणि प्रत्येक जीवन समाजासाठी महत्त्वाचे असते. मात्र, अलीकडील काळात देशात वाढत चाललेल्या आत्महत्यांच्या घटनांनी गंभीर चिंता निर्माण केली आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार देशामध्ये विविध भागात, विविध कारणांमुळे हजारो लोकांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे. ही परिस्थिती केवळ एखाद्या राज्यांपुरती मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी धोक्याची घंटा आहे. आत्महत्या ही वैयक्तिक समस्या नसून सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, सामाजिक व्यवस्था आणि शासन या सर्वांसमोरील मोठे आव्हान बनली आहे. अगोदर कर्जामुळे केवळ शेतकरीच आत्महत्या करायचे, पण त्यानंतर विद्यार्थी देखील आत्महत्या करू लागले आहेत आणि आता शिक्षक देखील त्याच मार्गाने जात आहेत. हे चित्र देशाचे प्रगतीसाठी नक्कीच भयावह आहे. आत्महत्येच्या मागे नैराश्य, मानसिक ताण, आर्थिक संकट, कौटुंबिक कलह, शैक्षणिक स्पर्धा, बेरोजगारी, व्यसनाधीनता आणि सामाजिक एकाकीपणा यांसारखी अनेक कारणे असतात. अनेकदा संकटाच्या क्षणी व्यक्तीला आपल्या अडचणींवर दुसरा कोणताही मार्ग दिसत नाही. भावनेचा तो क्षण टाळता आला पाहिजे. अशा वेळी योग्य वेळी मिळालेले समुपदेशन, भावनिक आधार आणि कुटुंबाचा पाठिंबा एखाद्याचा जीव वाचवू शकतो. त्यामुळे आत्महत्या रोखण्यासाठी केवळ वैद्यकीय उपचार पुरेसे नाहीत, तर संवेदनशील समाजव्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेचा ताण, करिअरची चिंता आणि स्पर्धेचा दबाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. गुणवत्तेपेक्षा गुणांना अधिक महत्त्व देणारी शिक्षण व्यवस्था अनेक विद्यार्थ्यांना मानसिकदृष्ट्या खचवते. त्याचप्रमाणे कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, शेतीतील अनिश्चितता आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही चिंताजनक आहे. शहरांमध्ये बेरोजगारी, नोकरीतील अस्थिरता आणि एकाकी जीवनशैलीमुळे तरुण मानसिक तणावाचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रत्येक राज्य शासनाने आत्महत्या प्रतिबंधासाठी व्यापक आणि परिणामकारक धोरण राबविण्याची गरज आहे. प्रत्येक जिल्हा रुग्णालयात, तालुका स्तरावर आणि मोठ्या गावांमध्ये मानसिक आरोग्य व समुपदेशन केंद्रे सुरू करावीत. ही केंद्रे चोवीस तास कार्यरत असावीत आणि प्रशिक्षित मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशक तसेच सामाजिक कार्यकर्ते उपलब्ध असावेत. संकटग्रस्त व्यक्तींना तातडीने मार्गदर्शन मिळावे यासाठी राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय हेल्पलाईन अधिक प्रभावीपणे कार्यान्वित करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये समुपदेशकांची नियुक्ती बंधनकारक करावी. विद्यार्थ्यांसाठी जीवनकौशल्य शिक्षण, तणाव व्यवस्थापन, भावनिक सक्षमता आणि अपयश स्वीकारण्याचे प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा भाग बनवावे. कार्यालये आणि उद्योगसंस्थांनीही कर्मचाऱ्यांसाठी मानसिक आरोग्य सहाय्य कार्यक्रम राबविणे काळाची गरज आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नाही. दर्जेदार बियाणे, खते, सिंचन सुविधा, पिकविमा, कर्ज पुनर्रचना आणि योग्य बाजारभाव याबाबत प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात कृषी समुपदेशनासोबत मानसिक आरोग्य समुपदेशनाची जोड दिल्यास सकारात्मक परिणाम दिसू शकतात. आत्महत्यांविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि कलंकाची भावना आहे. मानसिक तणाव किंवा नैराश्य याबद्दल खुलेपणाने बोलण्यास अनेकजण घाबरतात. त्यामुळे जनजागृती मोहिमा राबवून मदत मागणे ही कमजोरी नाही, तर धैर्याची निशाणी आहे हा संदेश समाजापर्यंत पोहोचवला पाहिजे. धार्मिक संस्था, सामाजिक संघटना, प्रसारमाध्यमे आणि स्वयंसेवी संस्था यांनीही या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा. आत्महत्या हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही. प्रत्येक संकट तात्पुरते असते आणि योग्य आधार मिळाल्यास त्यातून मार्ग नक्कीच निघू शकतो. कुटुंबातील सदस्य, मित्र, शिक्षक आणि सहकारी यांनी आपल्या आसपासच्या व्यक्तींच्या मानसिक स्थितीकडे संवेदनशीलतेने लक्ष देणे आवश्यक आहे. वेळेवर केलेली एक विचारपूस, दिलेला धीर किंवा योग्य समुपदेशन एखाद्याचे संपूर्ण आयुष्य वाचवू शकते. आज देशाला मानसिक आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या धोरणाची गरज आहे. प्रत्येक जिल्ह्यात समुपदेशन केंद्रे, प्रशिक्षित मानसोपचारतज्ज्ञ, प्रभावी हेल्पलाइन आणि व्यापक जनजागृती अभियान उभारले, तर अनेक अमूल्य जीव वाचू शकतात. प्रत्येक नागरिकाचा जीव हा राष्ट्राची संपत्ती आहे. त्यामुळे आत्महत्या रोखणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. एक जीव वाचवणे म्हणजे एका संपूर्ण कुटुंबाचे भविष्य वाचवणे हा विचार प्रत्येकाने मनात रुजवण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

# शाळेच्या दाराबाहेर उभे राहिलेले मुलींचे भविष्य



लोकसभेत शिक्षण मंत्रालयाने सादर केलेली मुलींच्या शाळा सोडण्यासंबंधीची आकडेवारी ही केवळ सांख्यिकीय माहिती नाही; ती भारतीय समाजाच्या विकासातील एक गंभीर विसंगती अधोरेखित करणारी वास्तवकथा आहे. माध्यमिक स्तरावर मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण २०२३-२४ मधील १२.६ टक्क्यांवरून २०२५-२६ मध्ये ८ टक्क्यांपर्यंत खाली आले, ही नक्कीच सकारात्मक बाब आहे. परंतु प्रत्येक शंभर मुलींमागे आठ मुली दहावीपूर्वीच शिक्षण सोडत असतील, तर ही घटना समाधान मानण्याइतकी नाही. कारण प्रत्येक शाळाबाह्य मुलगी म्हणजे एका व्यक्तीचेच नव्हे, तर एका कुटुंबाचे आणि अखेर समाजाचेही हरवलेले भविष्य असते.

प्राथमिक शिक्षणात मुलींची शाळेतील उपस्थिती जवळपास सार्वत्रिक झाली आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन आणि विविध शिष्यवृत्ती योजनांमुळे प्राथमिक स्तरावर शाळाबाह्य मुलींचे प्रमाण नगण्य आहे. मात्र, नववी आणि दहावीमध्ये पोहोचताच हे चित्र अचानक बदलते. याचा अर्थ शिक्षणात प्रवेश मिळवून देण्याइतकेच शिक्षण टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान बनले आहे.

सरकारने नमूद केलेली शाळा सोडण्याची प्रमुख कारणे अशी- घराच्या उत्पन्नात हातभार लावणे, घरकामाची जबाबदारी आणि पालकांना पुढील शिक्षणाची गरज वाटत नसणेही भारतीय समाजातील खोलवर रुजलेल्या मानसिकतेची साक्ष देतात. मुलगा शिकला तर तो कुटुंबाचा आधार बनेल, पण मुलगी शिकून काय करणार, अशी विचारसरणी अनेक भागांत अजूनही टिकून आहे. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे खर्च म्हणून पाहिले जाते, गुंतवणूक म्हणून नव्हे. घरगुती कामांचा भार हा मुलींच्या शिक्षणातील सर्वात मोठा अदृश्य अडथळा आहे. आई कामावर गेली किंवा घरात लहान भावंडे असली की त्यांची जबाबदारी मुलींवर येते. अभ्यासाऐवजी स्वयंपाक, पाणी भरणे, जनावरांची देखभाल किंवा इतर घरकामे त्यांच्यावर लादली जातात. परिणामी, शाळेत जाणे दुय्यम ठरते. आर्थिक गरिबीपेक्षा सामाजिक प्राधान्यक्रम हा येथे अधिक निर्णायक ठरतो.

राज्यनिहाय आकडेवारी आणखी महत्त्वाचा संदेश देते. लडाख, कर्नाटक, गुजरात किंवा आसाम यांसारख्या राज्यांतील उच्च शाळाबाह्य दर हे दर्शवतात की हा प्रश्न केवळ आर्थिक मागासलेपणाचा नाही. अनेक ठिकाणी माध्यमिक शाळा गावापासून दूर आहेत, सुरक्षित वाहतुकीची सुविधा नाही, मुलींच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये भीती आहे. किशोरावस्थेत स्वच्छतागृहांची कमतरता, मासिक पाळीबाबतच्या असुविधा आणि अल्पवयीन विवाह यांसारख्या सामाजिक समस्या मुलींच्या शिक्षणावर थेट परिणाम करतात. आज भारत 'विकसित भारत २०४७'चे स्वप्न पाहत आहे. परंतु देशातील लाखो मुली माध्यमिक शिक्षण पूर्ण करू शकत नसतील, तर हे स्वप्न अपूर्णच राहील. जागतिक स्तरावरील अनेक अभ्यास स्पष्ट करतात की, मुलींचे शिक्षण वाढले तर बालमृत्यू कमी होतात, कुटुंबाचे आरोग्य सुधारते, रोजगार वाढतो, लोकसंख्या नियंत्रणाला मदत होते आणि देशाचा आर्थिक विकास वेगाने होतो. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर होणारा खर्च हा सामाजिक कल्याणाचा नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीचा सर्वात फायदेशीर गुंतवणूक आहे.

या समस्येवर उपायही बहुआयामी असले पाहिजेत. केवळ शाळा उभारून किंवा शिष्यवृत्ती देऊन प्रश्न सुटणार नाही. माध्यमिक शाळा प्रत्येक मुलीच्या सहज पोहोचेल अशा अंतरावर असाव्यात. सुरक्षित वाहतूक व्यवस्था, मुलींसाठी स्वतंत्र व स्वच्छ स्वच्छतागृहे, किशोरवयीन आरोग्यविषयक सुविधा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना थेट प्रोत्साहन देणाऱ्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. त्याचबरोबर पालकांच्या मानसिकतेत बदल घडविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम हाती घेणे तितकेच आवश्यक आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये प्रत्येक मुलाला माध्यमिक शिक्षणापर्यंत टिकवून ठेवण्याचे उद्दिष्ट मांडले आहे. मात्र हे उद्दिष्ट केवळ सरकारी योजनांनी पूर्ण होणार नाही. समाज, शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि पालक यांनी एकत्रितपणे जबाबदारी स्वीकारावी लागेल. प्रत्येक गावात, प्रत्येक वस्तीत 'एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहणार नाही' हा सामाजिक संकल्प निर्माण झाला, तरच या आकडेवारीत खऱ्या अर्थाने बदल घडेल.

मुली शाळा सोडतात, तेव्हा त्या फक्त वर्गखोली सोडत नाहीत; त्या आपल्या स्वप्नांपासून, आत्मनिर्भरतेपासून आणि समान संधींपासूनही दूर जातात. म्हणूनच शाळाबाह्य मुलींची संख्या कमी करणे हा केवळ शिक्षण विभागाचा विषय नाही, तर तो सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि राष्ट्राच्या भविष्याचा प्रश्न आहे. भारताला विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर प्रत्येक मुलीला माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याची संधी ही तिचा अधिकार म्हणून सुनिश्चित करावी लागेल. तेव्हाच शिक्षणातील प्रगतीची आकडेवारी ही केवळ कागदावरील यशकथा न राहता, समाजाच्या परिवर्तनाची खरी कहाणी ठरेल.

-मच्छिंद्र ऐनापुरे,
जत जि.सांगली

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी शिक्षकांची भूमिका?

शिक्षणाच्या बाबतीतील मागील वर्षीचा इतिहास थोडक्यात असा आहे. मागील दीड-दोन वर्षापूर्वी शासनाने मुख्यमंत्री माझी शाळा हा उपक्रम राबविला होता. ज्यात मातीच्या वस्तू बनविणे, वृक्षारोपण करणे, शाळा व परिसर स्वच्छ करणे इत्यादी गोष्टी केल्या होत्या. ज्यात पंच्यान्नव प्रतिशत शाळातील दोन कोटी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. उरलेल्या पाच प्रतिशत शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला नाही. कारण त्या कॉन्व्हेंटच्या शाळा होत्या व काही शाळेत काही अपरिहार्य कारणानं उपस्थित झालेले नसल्यानं त्यांना सहभाग घेता आला नाही. त्यातच निवडणूक साक्षरता करणे, नवसाक्षर शिकविणे, शाळाबाह्य विद्यार्थी शोधणे, बीएलओची कामे करणे इत्यादी कामं देखील शिक्षकांच्या वाट्याला येत असतात.

खरं सांगायचं झाल्यास ही संकटं आहेत, विद्यार्थ्यांना सर्वकष ज्ञान देत असताना त्यात येणारी संकटं. त्यातच सर्वच शिक्षकांनी वर्षभर विद्यार्थ्यांना काय शिकवायचं, काय नको. याचं नियोजन तयार केलेलं असतं. त्यातच शासनाचे असे उपक्रम आलेच की, शिक्षकांच्या शिकविण्यात व्यत्यय निर्माण होतो. नियोजन कुठेतरी बिघडतं. ते बिघडत असताना शालेय अभ्यासक्रम मागे पडतो व सर्वात शेवटी विद्यार्थी हा घटक शालेय अभ्यासक्रम बरोबर शिकू शकत नाही अन् सर्वात शेवटी शासन विचारतं, 'आपल्या विद्यार्थ्यांत किती प्रगती झाली?' काय बोडकं प्रगती होणार?

विद्यार्थी शिकविण्यात चूक शासनाची असते. शासनाच्या काही काही चुकीच्या ध्येयधोरणानं शिक्षक पुरेपूर आपल्या विद्यार्थ्यांना शिकवू शकत नाही. कारण त्यांना पुरेसा वेळच मिळत नाही. शिवाय सध्याच्या काळात ऑनलाईन कामाचीही सरबत्ती. तासन्तास नेट बरोबर न चालत असल्यानं शिक्षकाला जशा राशनच्या दुकानात रांगा लावाव्या लागतात तशाच रांगा नेट कॅफेमध्ये लावाव्या लागतात. तरीही कामं पूर्ण होत नाहीत. शासनाला फक्त कामं हवीत. ती कामं कोण कशी करतो? त्या मार्गात कोणकोणत्या अडचणी येतात? त्याचं काही घेणंदेणं नसतंच. शिवाय काही शासनाविरोधात खुलेआम बोलतो म्हटल्यास संबंधित शिक्षकाला उजागीरीही नसतेच. त्यावर कारवाई होवू शकते.



असा आमचा शिक्षक शासनाचा अन्याय झेलत झेलत नोकरी करीत असतो. तो त्याही संकटांवर मार्ग काढून आपल्या विद्यार्थ्यांना शिकवीत असतो. कारण तो आपल्या विद्यार्थ्यांना केवळ विद्यार्थी समजत नाही, तर आपलं मुलच समजतो. ज्यातून जसा तो आपल्या स्वमुलाचे नुकसान चाहात नाही, तसंच नुकसान विद्यार्थ्यांचंही चाहात नाही. यात महत्वपूर्ण बाब ही की, विद्यार्थी व शिक्षकांच्या या कार्यात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा करायचा? याची कल्पना शिक्षकांना असतेच. कारण ते स्वतः राबतात. त्यांची अख्खी हयात जात असते. विद्यार्थी शिकविण्यात, त्यांना त्या गोष्टी सांगण्याची गरजच नाही. अमूक अमूक गोष्टी करा, अमूक अमूक गोष्टी करू नका. कारण ते काही एसीच्या कमऱ्यामध्ये बसून अभ्यासक्रम वा शासन निर्णय तयार करीत नसतातच. शिवाय त्यांना जे वेतन मिळतं ते वेतनदेखील त्यांच्या मेहनतीचं फळ असतं. शिवाय त्यांचं काम फक्त विद्यार्थी शिकविणं. अशावेळेस काय गरज आहे त्यांना निवडणूक साक्षरता ही मोहीम राबवायची? प्रत्येक मतदारयादीतील व्यक्ती शोधायची? हं, ठीक आहे की निवडणूक आहे व ती निवडणूक पार पाडली जात असताना कर्मचारी अपुरे पडत असल्यानं त्या जागी दोन तीन दिवसासाठी नियुक्ती करणं व ते नियोजन राबवणं. परंतु निवडणूक साक्षरता ही मोहीम ना त्या शिक्षकांची मोहीम आहे, ना त्या विद्यार्थ्यांची. कारण फायद्याची गोष्ट केल्यास त्याचा फायदा हा राजनेत्यांनाच होतो. कोणताही व्यक्ती निवडून आला तरी. शिवाय मतदानाची टक्केवारी विचारात घेतल्यास ज्याला मतदान करायचे तो करतोच आणि ज्याला मतदान करायचे नाही, त्याला कितीही वेळा समजावून सांगितले तरी तो मतदान करीत नाही. हे मागील लोकसभेच्या मतदानाची प्रक्रिया राबविताना प्रत्यक्षात दिसलंच. मग काय गरज आहे या कामी विद्यार्थी व शिक्षकांना गुरफटून घ्यायची आणि त्यातून विद्यार्थ्यांचं नुकसान करण्याची. असाच दुसरा मुद्दा असा की, नवभारत साक्षरता. होय, शिक्षकांचं काम आहे शिकविणं. तो कोणालाही शिकवू शकतो. परंतु त्याचा अर्थ असा नाही की, त्यानं शाळा सोडलेल्या, वय मोठे झालेल्या तसेच शिकूनही व्यवहार ज्ञान न शिकलेल्या लोकांना शिकविणे. ज्यात वेळ जाईल व जे त्याचं कार्य आहे, तेही कार्य त्याला करता येणार नाही.

महत्वाचं म्हणजे शिक्षकांचं काम आहे शिकविणे. त्या कोवळ्या कळ्यांना शिकविणे, त्यांच्यात योग्य ते संस्कार भरणे. त्यांना उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच तयार करणे. जेणेकरुन ते जर तयार झालेच तर उद्या तेच विद्यार्थी आपल्या ज्ञानाचा वापर करुन आपल्या देशाचा विकास करु शकतील. शिवाय जे शिकले ते शिकले. त्यांना आता नवभारत साक्षरतेच्या नावानं शिकवून काही उपयोग नाही. कारण कालच जे शिकू शकले नाहीत. ते आज काय शिकणार? हं, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचं ठीक आहे की, बिचाऱ्यांवर संकट आल्यानं ते शिकू शकले नाहीत. त्यांना शोधून त्यांच्या खानपानाची व्यवस्था लावून त्यांचं शिक्षण केलं गेलं तर कदाचीत त्यांचा देशाला उपयोग तरी होईल. राहिली गोष्ट असे विविध शालेय उपक्रम राबवायची. ते शिक्षकांवर सोडावं. ते बरोबर राबवतात. आपापल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावून. जसा वेळ मिळेल तसा. त्यांना अमूक अमूक उपक्रम राबवा. तरच विद्यार्थी शिकतील. हे सांगण्याची गरज नाही. कारण ते स्वतः शिक्षक आहे व त्यांनाच विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत काय करायचं, ते सगळं कळतं.

विशेष सांगायचं म्हणजे जसं आपल्या घरी आपण काय खावं आणि काय खावू नये. हे कळत असतं. तसंच शिक्षकांनाही काय आणि कसे शिकवावे हे सारंच कळतं. तेव्हा अमूक अमूक असे उपक्रम राबवा. विद्यार्थी घडतील हे सांगण्याची व ते सांगत असतांना ते विशिष्ट कालावधीतच राबवायची काहीही आवश्यकता नाही. कारण वेळेच्या पूर्वी व वेळेच्या नंतर काहीच गोष्टी घडत नाहीत. वेळ आल्यावरच सर्व गोष्टी घडतात. त्यातच अध्ययन प्रक्रियादेखील. शिवाय असे जर उपक्रम वेळेआधी राबवले तर नक्कीच खेळखंडोबा झाल्याशिवाय राहणार नाही. मग ना त्यावेळेस विद्यार्थी शिकतील, ना शिक्षक बरोबर शिकवू शकतील. अशावेळेस नुकसानच होईल. जे नुकसान पुढील काळात कधीच भरुन निघणार नाही अन् तसंच जर झालं तर उद्या जे आज विद्यार्थी आपल्या हातात आहेत तेच विद्यार्थी शाळाबाह्य होतील. ज्यांना शोधून नवभारत साक्षरता अभियानांतर्गत शिकवावे लागेल, यात शंका नाही. तेव्हा आज जी परिस्थिती आहे त्या परिस्थितीत शासनानं आतातरी थांबावे. उपक्रमाचा तगादा लावू नये. कारण शिक्षकांजवळ भरपूर कामं आहेत. ऑनलाईन कामंही पुरेशी आहेत. त्यामुळं कोणत्याही शिक्षकांच्या शिकविण्यात आणि कोणत्याही विद्यार्थ्यांच्या शिकण्यात उपक्रमाअंतर्गत व्यत्यय आणू नये व त्यांना त्यांच्या मताने शिकवू द्यावे. विद्यार्थी घडवू द्यावे, म्हणजे झालं. वाट पाहू नये त्या शिक्षकांची. जेव्हा शिक्षक ओरडतील व निक्षून शासनाला सांगतील की पुरं झालं उपक्रम राबवणं. आतातरी थांबा, आम्हाला विद्यार्थी घडवायचेय.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# जसा विचार कराल तसे बनाल!



जो समाजामध्ये वाईट विचार पसरतो. त्यांच्या बाजूने समाज कधी ही उभा राहू शकत नाही. ज्यांचे विचार सडलेले आहेत, ते व्यक्ती दूष्ट असतात. सकाळी सकाळी वाईट प्रवृत्तीच्या लोकांची तोंडी पाहू नयेत, असा समाजामध्ये समज आहे. सामाजिक प्रतिष्ठा मिळण्यासाठी चांगले कर्तृत्व करावे लागतात. दुष्ट विचार मनामध्ये सतत चालू राहिले तर मनुष्य समाजातून वाळीत पडतो. दुष्ट विचार करणाऱ्या लोकांचे कधीही कुठेही मंदिर, स्मारक, पुतळा, छत्री बांधलेले नाही. नेहमी त्याची समाजात अवहेलना, चेष्टा टिंगल- टवाळी, मस्करी केली जाते. चित्रपटातील खलनायक सुरुवातीला वाईट कृत्य करतो आणि काही वेळानंतर फासे उलटे फिरतात आणि तुरुंगात जाऊन खडी फोडत बसतो. त्याची कर्म त्याला फेडावी लागतात. त्याचे दुष्ट विचार त्याच्याच भोवती फिरतात आणि त्यांचे वाईट विचाराचे सामर्थ्य अल्पजीवी टिकते. म्हणून माणसाने दीर्घकालीन आपले नाव कसे समाजात सुगंधाप्रमाणे पसरत राहील, यासाठी उत्तमोत्तम कार्य करावे, त्यासाठीच हा लेखन प्रपंच...

माणूस हा स्वतःच्या शरीराची जशी काळजी घेतो, तसेच त्यांनी मनाची सुद्धा काळजी घ्यावी.विचार चांगले ठेवावेत. विचाराची शुद्धता फार महत्त्वाची आहे. जसे आपण शरीराची काळजी घेऊन मनाची जोपासना करतो, जोपर्यंत बुद्धी व आत्म्याचा विकास करण्याचा प्रयत्न आपण करत नाही, तोपर्यंत प्रगती होत नाही. विवेक जागृतीच्या बरोबरीने भौतिक व आध्यात्मिक प्रगती करावयाची असते. त्यामुळे आपणास स्वतःच्या पलीकडे पाहता येते, हे आपले ध्येय असावे. सशक्त समाजाची व राष्ट्राची निर्मिती सशक्त व्यक्तीपासूनच होऊ शकते. त्यासाठी प्रत्येकाने आपले मन साफ ठेवले पाहिजे. स्वतःचे कल्याण साधून घ्यावे व दुसऱ्यालासुद्धा कल्याण साधण्यासाठी वेळ द्यावा. योग्य वेळी मदत करावी.असे चांगले विचार असणे गरजेचे आहे.

मनात दुष्टचक्र नको, अनेक लोकांच्या मनात दुर्गंधी युक्त विचार असतात. आपले विचार वाईट असतील तर सर्वच वाईट होते. म्हणून आपले विचार कायमस्वरूपी चांगले ठेवावेत.ज्यांचे चांगले विचार आहेत, त्या महात्म्याचे आज सुद्धा एका दिवसात तीन वेळेस लोक नाव काढतात. ज्यांचे वाईट विचार आहेत. त्यांना लोक नेहमी दूषणे देतात. म्हणून आपल्या विचारांमध्ये मानवता, सत्यता, सचोटीपणा, प्रामाणिकपणा, दया, क्षमा, शांती, करुणा, परोपकार वृत्ती, सामंजस्यपणा, सभ्यता या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मतभेदाची लढाई असावी, मनभेदाची लढाई नसावी. एखादा व्यक्ती आपल्या पुढे जात असेल तर काही हरकत नाही. आपणही पुढे जाण्यासाठी रात्रंदिवस तेवढे परिश्रम करावेत.

आपल्या विचारांना परिश्रमाची जोड द्यावी ती कृतीत उतरावी. वाचावीर होऊ नये, कृतीवीर व्हावे, तेव्हा तुमच्या चांगल्या विचाराला तलवारीची धार येते. तलवारीने झालेली जखम पुसली जाऊ शकते; परंतु चुकीच्या विचाराने झालेली मनाची जखम कधीही आपण पुसू शकत नाही. हे खरे आहे. ज्ञानी व्यक्तींनी ज्ञानवंत व्हावे, आणि इतरांना भरभरून ज्ञान द्यावे, बागेने फुले द्यावीत, नदीनी पाणी द्यावे, शिक्षकांनी विद्यार्थ्याला अद्ययावत ज्ञान द्यावे, व्यापाऱ्यांनी आपल्या वस्तूची लोकांना शुद्धता द्यावी. सैनिकांनी समाजाला सुरक्षितता द्यावी, शेतकऱ्यांनी रयतेला अन्नधान्य द्यावे, मुलांनी आई-वडिलांना आधार द्यावा, निराधार करू नये. महिलांचा नेहमी सन्मान करावा, विद्यार्थ्यांनी गुरुचा आदर करावा. स्नुशांनी आपल्या आई-वडिलाप्रमाणे सासू-सासऱ्यांचाही आदर करावा. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना योग्य तो मान-सन्मान द्यावा, चुकल्यास एकांतात बोलून त्यांना समज द्यावी. हे सोन्यासारखे शब्द ऐकून माणसाच्या मनाची शुद्धता वाढते, आपले शब्द नेहमी सुगंधीत, सुवासिक अत्तर तेलाप्रमाणे असावेत, साधू-संतांची विचारधारा जोपासावी. त्यांच्या समाजप्रबोधन विचारांची पेरणी व्हावी.गुंड प्रवृत्तीच्या लोकांपासून दूर राहावे, त्यांचे विचार खालच्या दर्जाचे असतात. त्यामुळे त्यांचे सामर्थ्य अल्पजीवी टिकते.

अनेक व्यक्ती सुद्धा वाईट विचारांनी लोप पावले आहेत. दिसायला चांगली व्यक्ती जरी असली तरी त्यांचे विचार दुष्ट व फसवे आहेत. पुतना मावशींनी श्रीकृष्णाला फसवण्याचा प्रयत्न केली आणि स्वतः नष्ट झाली. वाकून नमस्कार करणे, तुमचीच आठवण काढत होतो, असे म्हणणे, तुम्ही नसल्यानंतर आमचे काय होईल? तुमच्यामुळे आम्ही सुखाचे दोन घास खातो, असे बोलणे हे सगळे ठकपणाची व स्वार्थीपणा साधण्याची अदृश्य लक्षणे आहेत. देखल्या देवा दंडवत म्हणून प्रत्यक्ष दिसणाऱ्या माणसांची दाढी कुरवाळयची आणि दूर गेल्यास टोमणे मारायचे हे चांगले नाही. म्हणून मानवांनी सद्गुणाची पेरणी करावी. कर्तृत्वान माणसांचा आदर करावा. देशाबद्दल नेहमी निष्ठा बाळगावी. अशा चांगल्या विचारांची नेहमी मानवाने सर्वच ठिकाणी पेरणी करावी. तेव्हाच समाज सुसंस्कृत होईल. समाजामध्ये नवचैतन्य निर्माण होईल. असे अमृतवाणी शब्द ऐकून अनेक जणांच्या मनाला ते भावस्पर्श करतात. यालाच चांगल्या विचाराचा सुगंध म्हणतात. पण आज विचाराची दुर्गंधी अनेक ठिकाणी चालू झाली आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये भ्रष्टाचार कसा करता येईल, असे अनेकजण म्हणत आहेत. यामध्ये जवळजवळ अशिक्षितपेक्षा सुशिक्षित लोकांचा भरणा जास्ती जास्त आहे. ते ही खालच्या दर्जाचे विचार करत आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारात दुर्गंधी पसरली आहे. अशी दुर्गंधी जर वाढत राहिली तर समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडेल.आज कोणत्याही क्षेत्रावर पूर्णपणे विश्वास राहिला नाही. समाजा-समाजामध्ये एक वाक्यता राहिली नाही.गटतट निर्माण झाले आहेत. काही दुराचारी, अति स्वाभिमानी लोक वेगवेगळे झेंडे हातामध्ये घेऊन सामाजिक एकात्मता बिघडून टाकत आहेत. अल्पसंख्याक समाजाचा विचार करत नाहीत. त्यामुळे तो समाज पतंगाच्या दोरी तुटल्यासारखा भरकटत आहे.अनेक अल्पसंतुष्ट लोक कसलाही विचार न करता परिपूर्ण अभ्यास नसलेले लोक ऊठसूट घोषणा देत आहेत. त्यामुळे अनेक लोकांचे विचार चांगले असूनही काही मोजक्या लोकांमुळे त्यांच्यातील वाईट विचारांची दुर्गंधी सुटली आहे. असेच जर होत राहिले तर या देशाचे काय होईल? पण आपल्या आयुष्यात कधी कधी असे काही क्षण येतात. तेव्हा सर्व आपल्या आशा मावळतात. सर्वत्र काळाकुट्ट अंधार दाटून येतो. पण याच काळात कसोटीच्या क्षणांमध्ये काही माणसे एखाद्या दीपस्तंभ सारखे उभे राहतात. कारण त्यांच्या विचाराला कृतीची जोड असते. त्यामुळे ते प्रकाशमान होतात. त्यांचा प्रकाश इतरांवरही पडतो. त्यामुळे ते उजळून निघतात. त्यामुळे संत कबीर म्हणतात ऐसी बात कहीए कोई ना बोले झूठ! ऐसी जगह बैठीए कोई ना बोले ऊठ !! त्यामुळे चांगल्या व्यक्तीच्या संगतीला राहा व सावलीला बसा, आणि आपल्या जीवनाचा उत्कर्ष करून घ्या, शेतीत बाजरीची पेरणी करुन गहू उगवण्याची अपेक्षा धरू नका. याचा अर्थ वाईट कृत्य करून सदगुणाची अपेक्षा मनात बाळगू नका? हे या ठिकाणी आजच्या तरुणांना आवर्जून सांगावे वाटते. पूर्ण पुरावे हाती आल्याशिवाय बाष्फळ बडबड करू नका. नाही तर सबळ पुराव्या अभावी अट्टल गुन्हेगार तुरुंगातून सुटतात व आपली नाचक्की होते. म्हणूनच दुष्ट व्यक्तींचे विचार चक्र नेहमी अल्पजीवी ठरते.

-प्रा. विठ्ठल बरसमवाड
अध्यक्ष: विठूमाऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड, जि. नांदेड

# स्वच्छता, पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण व्यवस्था सुधारण्यासाठी महापौरांचे अधिकाऱ्यांना कडक निर्देश

## संबंधित प्रभागांतील नगरसेवकांनी मांडल्या आक्रमकपणे समस्या



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता मुळे यांनी शहरातील नागरी समस्यांची गंभीर दखल घेत महापालिकेतील झोन क्रमांक १ व झोन क्रमांक २ अंतर्गत येणाऱ्या स्वच्छता, पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण विभागाची एक महत्त्वपूर्ण संयुक्त आढावा बैठक घेतली. महापालिका मुख्यालय येथील महापौरांच्या बैठक कक्षात पार पडलेल्या या बैठकीस दोन्ही झोनमधील संबंधित प्रभागांचे नगरसेवक आक्रमकपणे उपस्थित होते. त्यांनी आपापल्या भागातील प्रलंबित समस्यांचा पाढा महापौरांसमोर वाचला.

या बैठकीला महापालिकेचे उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, माजी सभापती किशोर स्वामी, माजी महापौर जयश्री पावडे, गटनेता संदीपसिंघ गाडीवाले, नगरसेवक सतीश देशमुख, उमेश पवळे, किशन कल्याणकर, सुहास कल्याणकर, मिनल पाटील, शांभवी साले, साहेबराव गायकवाड, दयानंद वाघमारे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त नितीन गाढवे, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहायक आयुक्त मो. गुलाम सादेक, क्षेत्रीय अधिकारी नागनाथ पतंगे, राजेश पाटील आणि इतर तांत्रिक अधिकारी उपस्थित होते.

झोन १ व २ मधील काही भागांत कमी दाबाने आणि विस्कळीत पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी नगरसेवकांनी मांडल्या. त्यावर महापौरांनी जलवाहिन्यांवरील गळती २४ तासांच्या आत दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आदेश दिले. दूषित पाण्याचा पुरवठा झाल्यास संबंधित अभियंत्याला जबाबदार धरण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच प्रभागांमधील अंतर्गत रस्ते आणि मुख्य चौकांमध्ये कचऱ्याचे ढीग साचणार नाहीत, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले. घंटागाड्या वेळेवर येणे, प्रत्येक प्रभागात नियमित झाडलोट होणे आणि स्वच्छता कामगारांची संख्या वाढविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे पावसाळा व ड्रेनेज लाईन रिस्टोरेशनचे काम अपूर्ण असल्यामुळे रस्त्यावर सांडपाणी येण्याच्या प्रकारांवर नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. महापौरांनी ड्रेनेज चेंबरची त्वरित सफाई व दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले. तसेच उघड्या नाल्यांमध्ये गाळ साचू न देता तो तातडीने उपसण्याचे आदेश यंत्रणेला दिले.

या आढावा बैठकीत झोन क्र. १ आणि झोन क्र. २ मधील सर्व नगरसेवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रत्यक्ष जमिनीवरील वस्तुस्थिती अधिकाऱ्यांसमोर मांडली. नगरसेवकांनी प्रभागातील अपुरे स्वच्छता कर्मचारी, मुख्य ड्रेनेज वाहिन्यांची दुरवस्था आणि काही वस्त्यांमध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याची असलेली गरज याकडे महापौरांचे लक्ष वेधले. लोकप्रतिनिधींच्या या तक्रारींची नोंद घेत महापौरांनी प्रशासनाला नगरसेवकांशी समन्वय ठेवूनच कामांचे नियोजन करण्याचे निर्देश दिले.

नांदेड शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. झोन क्र. १ आणि २ मधील नागरिकांकडून पाणी आणि अस्वच्छतेबाबत येणाऱ्या तक्रारी खपवून घेतल्या जाणार नाहीत. अधिकाऱ्यांनी केवळ कागदोपत्री अहवाल न देता प्रत्यक्ष जागेवर जाऊन कामांची पाहणी करावी. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आणि कंत्राटदारांवर कडक दंडात्मक कारवाई केली जाईल.

# स्वारातीम विद्यापीठात क्रीडा संचालकांसाठी तीन दिवसीय कार्यशाळेला प्रारंभ



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांतील क्रीडा संचालकांसाठी Three-Day Workshop for Directors of Physical Education and Sports या तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.२८ ते ३० जुलै दरम्यान करण्यात आले आहे. या कार्यशाळेला आज उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला असून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांतील क्रीडा संचालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, अधिसभा सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, डॉ. महेश बेंबडे, क्रीडा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. कैलास पाळणे तसेच कार्यशाळेचे आयोजन सचिव व विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

पहिल्या दिवशीच्या पहिल्या सत्रात डॉ. प्रवीण डाबरे (जळगाव) यांनी Best Practices in Sports dministration या विषयावर मार्गदर्शन केले. क्रीडा प्रशासनातील आधुनिक संकल्पना, प्रभावी नियोजन, व्यवस्थापन आणि उत्कृष्ट कार्यपद्धती याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

ही कार्यशाळा सलग तीन दिवस विविध तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून, क्रीडा क्षेत्रातील नवीन धोरणे, प्रशासन, व्यवस्थापन आणि गुणवत्ता वृद्धी याविषयी सहभागी क्रीडा संचालकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यशाळेला सर्व महाविद्यालयांतील क्रीडा संचालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठाच्या क्रीडा विभागातील संजयसिंह ठाकूर, शिवाजीराव हंबर्डे, राम किरकन, सुनील लुटे आणि रतनसिंग पुजारी आदी विशेष परिश्रम घेत असून, कार्यशाळेचे नियोजन व व्यवस्थापन उत्कृष्टरीत्या पार पाडले जात आहे.

# एसडीआरएफच्या मार्गदर्शनाखाली शेळगाव थडी येथे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

## शोध व बचाव कार्याबाबत स्थानिक पथक, विद्यार्थी व नागरिकांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन



**नांदेड (प्रतिनिधी)–** धर्माबाद तालुक्यातील मौजे शेळगाव थडी येथील हनुमान मंदिर परिसरात जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या वतीने राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ), धुळे यांच्या सहकार्याने नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

स्थानिक शोध व बचाव पथकांना आपत्तीच्या प्रसंगी प्रभावीपणे कार्य करता यावे, यासाठी शोध व बचाव कार्याचे प्रशिक्षण, प्रत्यक्ष सराव तसेच शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ आणि नागरिकांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या संकल्पनेतून आणि निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले.

प्रशिक्षणासाठी एसडीआरएफ, धुळे तुकडी क्रमांक १ चे रेस्क्यू टीम कमांडर तथा पोलीस निरीक्षक रघुनाथ पवार, उपपोलीस निरीक्षक सुरेश संकपाळ, सुरेश बगाड, राहुल आवचार तसेच ३३ प्रशिक्षित बचावकर्ते जवान उपस्थित होते. मान्सून तैनातीसाठी नांदेड येथे मुक्कामी असलेल्या या पथकाने विविध आपत्तीजन्य परिस्थितींमध्ये शोध व बचाव कार्याची प्रात्यक्षिके सादर केली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे गौरव तिवारी आणि बारकुजी मोरे उपस्थित होते. तसेच उपविभागीय अधिकारी धनंजय राऊत, तहसीलदार, सर्व मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. धर्माबाद व कुंडलवाडी येथील शालेय विद्यार्थ्यांनीही प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या प्रशिक्षणामुळे स्थानिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाबाबतची सज्जता वाढण्यास मदत होणार असून, नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी सुरक्षिततेचे उपाय अवलंबून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत मॉडर्नचे घवघवीत यश

**उमरी (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या इयत्ता ४ थी आणि ७ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा राखत घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये इयत्ता ४ थी तील ५ आणि इयत्ता ७ वी मधील ८ असे एकूण १३ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहेत.

इयत्ता ४ थी- यश भुजबळे, सर्वज्ञ पाटील, ओंकार बिजमवार, अथर्व देशटवार, आरोही माने आणि इयत्ता ७ वीतील सुजल सबनवाड, श्रीनिधी यम्मेवार, शिवराज चव्हाण, ऋषीकेश लिंगाडे, प्राप्ती आर्सेवाड, ममताश्री शिंदे, माही आसावा, जीविका पेंडकर ह्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय उमरीच्या उपरोक्त विद्यार्थ्यांनी शाळेची यशाची परंपरा कायम राखत जे नेत्रदीपक यश संपादन केले आहे त्याबद्दल शाळेच्यावतीने शाळेत मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पहार घालून अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, सौ. सायली अपसिंगेकर, सौ. सानिका सराफ यांनी अभिनंदन केले.

# लिंगायत वाणी समाजाच्या स्मशानभूमीवरील अतिक्रमण त्वरित काढण्याची मागणी

## आमरण उपोषण करण्याचा दिला नगरपंचायत प्रशासनाला इशारा

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** शहरातील पोलीस ठाण्याच्या समोर लिंगायत वाणी समाजाची स्मशानभूमी आहे. या ठिकाणी काहींनी अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण त्वरित हटवा अन्यथा आमरण उपोषण करू, असा इशारा लिंगायत वाणी समाजाने एका निवेदनाद्वारे नगर पंचायत प्रशासनाला दिला आहे.

अर्धापुरात लिंगायत वाणी समाजाच्या स्मशानभूमीत मांस विक्रीचे दुकाने थाटून बिनधास्तपणे विक्री करण्यात येत आहे. याकडे नगरपंचायत प्रशासन मूग गिळून गप्प का असा सवाल जनता करीत आहे. नगरपंचायत प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन स्मशानभूमीतील अतिक्रमण काढावे अन्यथा नगरपंचायत समोर उपोषण करण्याचा इशारा नगरपंचायत प्रशासनाला लिंगायत वाणी समाजाने दिला आहे. या निवेदनाच्या प्रती नगराध्यक्षा सौ. वैशाली प्रवीण देशमुख यांच्यासह नगरसेवकांना दिले आहे.

या निवेदनावर अंबादास आंबेगांवकर, अशोक डांगे, संभाजी बासरे, विजयकुमार पत्रे, निलेश चिंचोलकर, गजानन पिंपळगावकर, निलेश हिंगमिरे, संतोष हिंगमिरे यांच्यासह लिंगायत वाणी समाजाच्या अनेकांच्या सह्या आहेत.

नगरपंचायतची निवडणूक सहा महिन्यांवर येऊन ठेपली असल्याने नगरपंचायतमधील सत्ताधारी मंडळी अतिक्रमण काढतील की अतिक्रमणधारकांना पाठीशी घालतील याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीत बिनविरोध संचालक झालेल्या शिवराम लुटे यांचा सत्कार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पगारदार कर्मचारी पतसंस्थेच्या ब गटातून बिनविरोध निवड झालेल्या शिवराम लुटे यांच्या असर्जन भगतसिंग चौक व विष्णुपुरी काळेश्वर कमान येथे मित्र मंडळ व समर्थकांनी फटाक्यांची आतीषबाजी व गुलाल उधळून सत्कार केला.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ब गटातून शिवराम लुटे यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर असर्जन येथील भगतसिंग चौक येथे नारायण लुटे, बाबुराव धुमाळ, गोपीचंद लुटे, गोविंदराव धुमाळ, तातेराव जाधव, भगवानराव वैध, बाबाराव धुमाळ, प्रकाशराव धुमाळ, बळीराम वैद्य, अवधुत लोंढे, जयसिंग हंबर्डे, ॲड. एजाज, पंडितराव लुटे यांनी सत्कार केला.

विष्णुपुरी काळेश्वर कमान येथे सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, बालाजी गिरगावकर, पांडुरंग हंबर्डे, गिरी महाराज, शिवप्रसाद कुबडे व हंबर्डे यांची उपस्थिती होती.

# जि. प. च्या शिक्षणाधिकारी फुटाणे यांच्याविरोधात भ्रष्टाचाराची तक्रार; कामबंद आंदोलनाचा इशारा

## कारवाईच्या भीतीने शिक्षणाधिकाऱ्यांकडून माफी; मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांच्या निर्णयाकडे लक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनने भ्रष्टाचार व कर्मचाऱ्यांच्या छळाची लेखी तक्रार दाखल केली आहे. युनियनचे राज्य अध्यक्ष बाबुराव पुजरवाड यांनी विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त दादासाहेब वानखेडे यांच्याकडे चौकशीची मागणी केली आहे. चौकशी न झाल्यास ५ ऑगस्टपासून सर्व कर्मचारी कामबंद आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

कर्मचाऱ्यांनी शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्यावर छळ, मनमानी आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत. युनियनचे अध्यक्ष बाबुराव पुजरवाड यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी महेश पाटील यांना निवेदन देऊन, कोणत्या विभागातून किती रुपये हप्ता मागितला जातो याची लेखी माहिती दिली आहे.

या पार्श्वभूमीवर पुजरवाड यांनी शिक्षण विभागातील सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीला जिल्हाध्यक्ष धनंजय घुमलवार, सचिव राघवेंद्र मदनूरकर यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी फुटाणे यांच्या कारभाराची कहाणी अध्यक्षांसमोर मांडली.

दै. गोदातीर समाचारने कर्मचाऱ्यांच्या कामबंद आंदोलनाचे वृत्त प्रकाशित करताच जिल्हा परिषद प्रशासन खडबडून जागे झाले. कारवाईच्या धास्तीने शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी यू-टर्न घेत सर्व कर्मचाऱ्यांना वैयक्तिकरित्या बोलावून माफी मागण्यास सुरुवात केली आहे. पुन्हा अशी चूक होणार नाही असे आश्वासनही त्यांनी दिले. मात्र कर्मचाऱ्यांनी ही माफी फेटाळून लावली असून ते आंदोलनावर ठाम आहेत.

विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त दादासाहेब वानखेडे जिल्हा परिषदेत प्रशासकीय कामानिमित्त आले असता, युनियनच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली. शिष्टमंडळात पुजरवाड, घुमलवार, मदनूरकर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. उपायुक्तांनी तक्रारींची चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

कर्मचारी युनियनने मुख्यकार्यकारी अधिकारी महेश पाटील यांना ४ ऑगस्ट २०२६ पर्यंत शिक्षणाधिकारी फुटाणे यांच्याविरोधात कारवाई करण्याची अंतिम मुदत दिली आहे. मुदतीत कारवाई न झाल्यास ५ ऑगस्टपासून जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे सर्व कर्मचारी कामबंद आंदोलन करणार आहेत. मुख्यकार्यकारी अधिकारी महेश पाटील या प्रकरणात काय भूमिका घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ॲग्रीस्टॅक कार्डसाठी पैसे मागितल्यास तक्रार करा -तहसीलदार अभिजीत जगताप

**माहूर (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांसाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या ॲग्री स्टॅक कार्डसाठी सेतू सुविधा केंद्र किंवा इतर कोणीही पैशाची मागणी केल्यास पुराव्यासह थेट तक्रार करा, तत्काळ कारवाई करण्यात येईल, असे आवाहन माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे



माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप यांनी प्रेस नोट जाहीर करून शेतकऱ्यांना आवाहन केले की, ॲग्री स्टॅक योजनेअंतर्गत शासनाकडून कोणतेही अधिकृत कार्ड जारी करण्यात आलेले नाही. त्यामुळे ॲग्रीस्टॅक कार्ड देण्याच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीने किंवा सेतू केंद्राने नागरिकांकडून कोणत्याही प्रकारची शुल्क आकारणी करणे अधिकृत नाही.

ॲग्रीस्टॅक प्रणालीमध्ये शेतकऱ्याची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर प्राप्त होणारा फार्मर रजिस्ट्री क्रमांक ॲग्रीस्टॅक क्रमांक हाच शासनमान्य व ग्राह्य क्रमांक आहे. यासाठी कोणत्याही स्वतंत्र कार्डची आवश्यकता नाही.

जर कोणतेही सेतू केंद्र किंवा इतर कोणतीही व्यक्ती ॲग्रीस्टॅक कार्ड काढून देण्याच्या नावाखाली कोणतीही रक्कम आकारत असल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित व्यक्तीविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यासाठी त्याबाबतची तक्रार पुराव्यासह तहसील कार्यालय, माहूर येथे तात्काळ दाखल करावी त्यांचे वर लगेच कारवाई करण्यात येईल, असे तहसीलदार अभिजीत जगताप यांनी कळविले आहे.

# अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त घुंगराळा येथे नायगाव तालुका वीज समस्या निवारण मेळावा



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांच्या वतीने ग्रामीण भागातील वीज समस्यां सोडविण्यासाठी वीज समस्या निवारण मेळावा या लोकउपयोगी कार्यक्रम घुंगराळा येथे नुकताच घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांची उपस्थिती होती. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महावितरणचे अधीक्षक अभियंता संजय खंडारे, कार्यकारी अभियंता पेंढारकर, उपअभियंता पाटील, कनिष्ठ अभियंता जाधव यांच्यासह वीज वितरण कंपनीचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या मेळाव्यात उपस्थित लोकप्रतिनिधी, सरपंच, शेतकरी, उद्योजक यांच्याकडून विजेच्या संदर्भातील अडीअडचणी, समस्या, तक्रारी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी लेखी, तोंडी स्वरूपात जाणून घेतल्या. यामध्ये प्रामुख्याने डीपी दुरुस्ती, नवीन डीपी बसविणे, नवीन पोल बसविणे, देखभाल दुरुस्ती, लोडशेडिंगचे वेळापत्रक याबाबत उपस्थित नागरिक आणि अधिकारी यांच्यात चर्चा करण्यात आली. त्यावर उपस्थित अधिकाऱ्यांनी तत्काळ ही कामे मार्गी लावून लवकरात सर्व कामे पूर्ण करू, असे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक वसंत सुगावे पाटील यांनी केले. यावेळी अजितदादांच्या कार्याची माहिती देत शेतकरी व तळागाळातील लोकांसाठी काम करणारे असे अजितदादा यांचे नेतृत्व होते यांनी याच भावनेने अजीतदादा यांना अभिवादन करण्यासाठी या समाजउपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे आपल्या प्रास्तविकातून सांगितले. यावेळी अधीक्षक अभियंता खंडारे यांनी सर्व तक्रारांची दखल घेत सर्व कामे तात्काळ करू असे आश्वासन दिले.

या वेळी विश्वनाथ बडुरे, प्रशांत नांदरे, संतोष वानखेडे, शिवाजी ढगे, सूर्यभान डुबुकवाड व गोविंद ताटे, भाऊसाहेब ताटे, नामदेव शिंदे, गोविंदराव जाधव, कोंडीबा दत्तराम ढगे, आनंद हेडगे, सटवाजी मोदलवाड, किशन निवृत्ती नुकुलवाड, निलेश देशमुख, गजानन शिंदे, बळवंत शिंदे, बालाजी शिंदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# पीपल्स कॉलेजच्या प्रांगणात पुन्हा फुलला संवादाचा कट्टा -सीए. डॉ. प्रवीण पाटील

## पीपल्स कट्टा संवाद व्यासपीठाचे मान्यवरांच्या हस्तेचे उद्घाटन




**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील पीपल्स कॉलेजमध्ये मंगळवारी पीपल्स कट्टा संवाद व्यासपीठाचे उद्घाटन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए. डॉ. प्रवीण पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोसायटीच्या सचिव प्रा. श्यामल पत्की होत्या. यावेळी सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, कार्यकारिणी सदस्य ॲड. चिरंजीलाल दागडिया, पीपल्स हायस्कूल शालेय समितीचे अध्यक्ष नौनिहालसिंघ जहागिरदार, प्रा. डॉ. यशपाल भिंगे, प्रा. विलास वडजे, राहुल गोरे, शशीमोहन नंदा, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे, डॉ. बालाजी कोम्पलवार यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी आपल्या मनोगतात कॉलेज कट्ट्याचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, महाविद्यालयीन शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नसते. विचार करण्याची क्षमता, नेतृत्वगुण, सामाजिक भान, सहिष्णुता, मैत्री आणि आत्मविश्वास यांची जडणघडण अशाच संवादातून होत असते. कट्ट्यावर होणाऱ्या चर्चा अनेकदा विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देतात. याच ठिकाणी अनेक कलाकार, साहित्यिक, पत्रकार, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, नेते आणि सामाजिक कार्यकर्ते घडण्याची बीजे रुजत असतात. 'पीपल्स कट्टा' हा फक्त बसण्यासाठी उभारलेला कोपरा नाही, तो भावनांचा, विचारांचा आणि स्वप्नांचा संगम आहे. येथून उमटणारे प्रत्येक हास्य, प्रत्येक संवाद, भावना आणि प्रत्येक नवा विचार उद्याच्या समाजाला अधिक संवेदनशील, सुसंस्कृत आणि विवेकी बनविण्याची ताकद बाळगून आहे. वर्षानुवर्षे या कट्ट्यावर असंख्य पावले उमटतील, नवी मैत्री फुलेल, असंख्य स्वप्ने आकार घेतील.

यावेळी संस्थेच्या 'दर्पण' या त्रैमासिकाचेही प्रकाशन करण्यात आले. संस्थांतर्गत प्राध्यापक, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या अभिव्यक्तीला व्यासपीठ उपलब्ध करून देणारे हे मासिक आणि विद्यार्थ्यांसाठी नव्याने उभारलेला 'पीपल्स कट्टा' ही दोन्ही माध्यमे प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची नवी दारे उघडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांची वाढती मागणी

**भारतातील दागिन्यांच्या बाजारपेठेत गेल्या काही वर्षांत मोठा बदल पाहायला मिळत आहे. नैसर्गिक हिऱ्यांच्या (Natural Diamond) दागिन्यांची मागणी झपाट्याने वाढत असून, ग्राहकांच्या खरेदीच्या सवयीही बदलत आहेत. विशेष म्हणजे, या वाढीमध्ये टियर-२ आणि टियर-३ शहरांतील ग्राहकांचा मोठा वाटा असल्याचे दिसून येत आहे. डी बिअर्स ग्रुपच्या इंडिया डायमंड ॲक्विझिशन स्टडी २०२५ नुसार, भारतातील नैसर्गिक हिऱ्यांची बाजारपेठ २०३० पर्यंत सुमारे १.५ लाख कोटींवर पोहोचण्याचा अंदाज आहे. या अभ्यासात महिलांच्या खरेदीच्या सवयींमध्ये मोठा बदल झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. आता दागिने केवळ लग्नसमारंभ किंवा विशेष प्रसंगांसाठीच नव्हे, तर दैनंदिन वापरासाठीही खरेदी केले जात आहेत.**



## छोट्या शहरांमधून वाढीला मिळतेय चालना

पूर्वी हिऱ्यांच्या दागिन्यांची खरेदी प्रामुख्याने महानगरांपुरती मर्यादित होती. मात्र आता टियर-२ आणि टियर-३ शहरांतील ग्राहक या बाजारपेठेच्या वाढीचे प्रमुख आधार बनत आहेत. या शहरांमध्ये वाढते उत्पन्न, इंटरनेट आणि डिजिटल सुविधांचा विस्तार तसेच आधुनिक जीवनशैलीची वाढती ओढ यामुळे ग्राहकांच्या पसंतीत लक्षणीय बदल झाला आहे. याशिवाय सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे अनेक ग्राहक नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांकडे आकर्षित होत आहेत. सोन्याचे दागिने अधिक महाग होत असताना, नैसर्गिक हिरे हे आकर्षक आणि दीर्घकालीन मूल्य असलेला पर्याय म्हणून स्वीकारले जात आहेत.

## लग्न आणि सणांपुरती मर्यादा राहिली नाही...

भारतात पारंपरिकपणे दागिन्यांची खरेदी ही लग्नसमारंभ आणि सणांशी जोडली जात होती. मात्र हा कल आता बदलत आहे. ब्रायडल कलेक्शनमध्ये नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांना मोठी पसंती मिळत आहे. डी बिअर्स ग्रुपच्या २०२५ च्या अभ्यासानुसार, टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये विशेषतः प्रीमियम आणि लक्झरी विभागात नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांची नवीन मागणी निर्माण होत आहे. नेकलेस, अंगठ्या आणि कानातले हे आता वधूच्या पोशाखाचा महत्त्वाचा भाग बनत आहेत.

## बदलत्या भेटवस्तूंच्या संकल्पना

हा बदल केवळ महानगरांपुरता मर्यादित राहिलेला नाही. छोट्या शहरांतील ग्राहकांमध्येही भेटवस्तू देण्याच्या पद्धतीत बदल होत असून, आधुनिक आणि उपयुक्त पर्यायांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे नैसर्गिक हिऱ्यांचे दागिने अधिक लोकप्रिय ठरत आहेत.



## डिजिटल क्रांतीचा मोठा प्रभाव

या बदलामागे डिजिटल माध्यमांचीही महत्त्वाची भूमिका आहे. सोशल मीडिया, ई-कॉमर्स संकेतस्थळे आणि ऑनलाइन ज्वेलरी प्लॅटफॉर्ममुळे छोट्या शहरांतील ग्राहकांना नवीन डिझाइन्स, किंमती, प्रमाणपत्रे आणि गुणवत्तेची माहिती सहज उपलब्ध होत आहे. आज ग्राहक ऑनलाइन विविध डिझाइन्स पाहू शकतात, किंमतींची तुलना करू शकतात आणि गुणवत्तेची खात्री करून खरेदीचा निर्णय घेऊ शकतात. डिजिटल पेमेंटमुळे खरेदीची प्रक्रिया अधिक सुलभ झाली असून, ग्राहक घरबसल्या दागिन्यांची निवड आणि खरेदी करत आहेत.

## ब्रँड्सनीही बदल ओळखला

दागिन्यांच्या ब्रँड्सनी ग्राहकांच्या बदलत्या पसंतीचा वेध घेत टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये विस्तार सुरू केला आहे. नवीन शोरूम उघडणे, स्थानिक संस्कृती, सण आणि विवाहसोहळ्यांनुसार विशेष कलेक्शन तयार करणे यावर कंपन्यांचा भर आहे. त्यामुळे प्रथमच हिऱ्यांचे दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांची संख्या वाढत आहे. उद्योगतज्ज्ञांच्या मते, पुढील काही वर्षांत नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांचा हा विभाग आणखी वेगाने वाढण्याची शक्यता आहे.

## केवळ दागिना नव्हे, तर भावनिक गुंतवणूक

ग्राहकांचा दागिन्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलत आहे. आजचे ग्राहक केवळ सौंदर्यासाठी दागिने खरेदी करत नाहीत, तर त्यामागील भावनिक मूल्य, वारसा आणि दीर्घकालीन गुंतवणूक यांनाही महत्त्व देत आहेत. तरुण पिढी हिऱ्यांच्या दागिन्यांकडे पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवता येणारी मौल्यवान संपत्ती म्हणून पाहत आहे. त्यामुळे नैसर्गिक हिऱ्यांचे दागिने केवळ आकर्षक दिसण्यासाठीच नव्हे, तर टिकाऊपणा, भावनिक नाते आणि कौटुंबिक वारसा यांचे प्रतीक म्हणूनही अधिक लोकप्रिय होत आहेत. आज अनेक कुटुंबांसाठी हिऱ्यांचे दागिने म्हणजे केवळ अलंकार नाहीत, तर पिढ्यानपिढ्या जपला जाणारा वारसा आहेत. त्यामुळे भारतातील नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांची वाढती लोकप्रियता ही केवळ बाजारपेठेतील बदल नसून, ग्राहकांच्या बदलत्या विचारसरणीचेही प्रतिबिंब मानले जात आहे.

# दररोजचा मेकअप सुंदर दिसण्यासाठी आयलाइनर महत्त्वाचा

**मेकअप आर्टिस्टच्या 'या' सोप्या टिप्स नवख्यांसाठीही उपयुक्त!**



**चेहऱ्याचा मेकअप कितीही आकर्षक केला तरी आयलाइनर योग्य पद्धतीने लावला नसेल, तर संपूर्ण लूक अपूर्ण वाटू शकतो. आयलाइनरमुळे डोळ्यांचे सौंदर्य खुलते आणि त्यांच्या आकारालाही उठाव मिळतो. मात्र, योग्य प्रकारचा आयलाइनर निवडणे आणि तो डोळ्यांच्या आकारानुसार लावणे तितकेच महत्त्वाचे आहे. विशेषतः नवशिक्यांसाठी काही सोप्या मेकअप टिप्स उपयुक्त ठरू शकतात.**

## योग्य आयलाइनरची निवड कशी करावी?

- बाजारात विविध प्रकारचे आयलाइनर उपलब्ध आहेत. आपल्या गरजेनुसार त्यांची निवड करावी.
- लिक्विड आयलाइनरः ठळक, तीक्ष्ण आणि स्पष्ट रेषा काढण्यासाठी सर्वोत्तम. पार्टी किंवा विशेष प्रसंगी वापरण्यास योग्य.
- पेन आयलाइनर : नवशिक्यांसाठी सर्वात सोपा पर्याय. हात स्थिर नसला तरी सहज वापरता येतो.
- जेल आयलाइनर : सहज ब्लेंड करता येतो. स्मोकी आय मेकअपसाठी हा उत्तम पर्याय आहे.
- पेन्सिल आयलाइनरः रोजच्या वापरासाठी तसेच वॉटरलाइनवर लावण्यासाठी उपयुक्त.

## डोळ्यांच्या आकारानुसार आयलाइनर लावा

- प्रत्येकाच्या डोळ्यांचा आकार वेगळा असतो. त्यामुळे त्यानुसार आयलाइनर लावल्यास चेहऱ्याचे सौंदर्य अधिक खुलते.
- हुडेड आय (Hooded Eyes) : अतिशय पातळ आयलाइनर लावा. डोळे उघडे ठेवून विंग तयार करा.
- गोलाकार डोळे (Round Eyes) : संपूर्ण वरच्या भागावर जाड आयलाइनर लावू नका. बाहेरील कोपऱ्याकडे अधिक भर द्या. लांब विंग काढल्याने डोळे अधिक लांबट दिसतात.
- मोनोलिड (Monolid Eyes) : स्मज केलेला आयलाइनर अधिक उठून दिसतो. आतील बाजूला पातळ आणि बाहेरील बाजूला जाड रेषा काढा.
- खाली झुकलेले डोळे : बाहेरील कोपऱ्याकडे रेषा वरच्या दिशेने उचला. विंग खूप लांब ठेवू नका. खालच्या पापणीवर जाड आयलाइनर किंवा काजळ लावणे टाळा.
- बदामाकार डोळे (Almond Eyes) : या प्रकारच्या डोळ्यांवर जवळपास सर्व प्रकारचे आयलाइनर आकर्षक दिसतात.

## मेकअप आर्टिस्टच्या खास टिप्स

- आयलाइनर लावण्यापूर्वी मस्कारा लावू नका.
- एकाच स्ट्रोकमध्ये पूर्ण आयलाइनर काढण्याचा प्रयत्न करू नका.
- नवशिक्यांनी आधी छोटे डॉट्स करून मार्गदर्शक रेषा तयार कराव्यात.
- डोळ्याच्या आतील कोपऱ्यात आयलाइनर जाड ठेवू नका.
- बाहेरील भागापासून आतल्या दिशेने आयलाइनर लावा.
- शेवटी बोटांच्या मदतीने पापणी हलकी वर उचलून रिकामी राहिलेली जागा भरून काढा.

### आयलाइनर बिघडल्यास काय कराल?

इअरबडवर मायसेलर वॉटर किंवा मॉइश्चरायझर घेऊन फक्त बिघडलेला भाग हलक्या हाताने पुसा. आयलाइनर वरच्या भागावर लागल्यास तो पूर्ण सुकू द्या. नंतर कोरड्या इअरबडने सहज काढता येतो.

## डोळ्यांच्या सुरक्षिततेचीही घ्या काळजी

नेहमी विश्वासार्ह ब्रँडचे आयलाइनर वापरा. उत्पादनाची एक्सपायरी डेट तपासा. संवेदनशील डोळे असल्यास 'Ophthalmologist Tested' किंवा 'Sensitive Eyes' असे नमूद असलेली उत्पादने निवडा. आयलाइनरचा वास किंवा पोत बदलल्यास त्याचा वापर त्वरित बंद करा. इतरांचा आयलाइनर वापरणे टाळा. त्यामुळे डोळ्यांच्या संसर्गाचा धोका वाढू शकतो. योग्य प्रकारचा आयलाइनर निवडणे, डोळ्यांच्या आकारानुसार तो लावणे आणि स्वच्छतेची काळजी घेणे या काही साध्या सवयी अंगीकारल्यास नवशिक्यांनाही आकर्षक आणि व्यावसायिक पद्धतीचा आय मेकअप सहज करता येऊ शकतो.



## आयलाइनर लावताना हात स्थिर ठेवा

आयलाइनर लावताना हात हलल्यास रेषा बिघडू शकते. यासाठी कोपर टेबलवर टेकवा. करंगळी हलक्या हाताने गालावर ठेवून हाताला आधार द्या. त्यामुळे हात स्थिर राहतो आणि रेषा अधिक अचूक काढता येते.



## विंग्ड आयलाइनर कसा काढावा?

डोळ्याच्या बाहेरील कोपऱ्यापासून सुरुवात करा. भुवईच्या शेवटच्या टोकाकडे जाणारी काल्पनिक रेषा लक्षात घेऊन छोटा विंग तयार करा. त्यानंतर ती रेषा पापण्यांच्या रेषेशी जोडून त्रिकोणी आकार तयार करा. तयार झालेली जागा भरून उरलेल्या पापणीवर आवश्यक त्या जाडीचा आयलाइनर लावा.

# प्रत्येक क्षणी जोडीदारावर संशय?

## हे 'रिलेशनशिप ओसीडी'चे लक्षण तर नाही ना? जाणून घ्या, नात्यात कसे पसरते विष...

**आजकाल सोशल मीडियावर सतत आनंदी, हसतमुख आणि 'परफेक्ट' दिसणाऱ्या जोडप्यांचे फोटो व व्हिडिओ पाहायला मिळतात. मात्र या आभासी परिपूर्णतेचा अनेक तरुणांच्या वास्तविक नात्यांवर विपरीत परिणाम होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. इतरांचे 'परिपूर्ण' नाते पाहून अनेक जण स्वतःच्या जोडीदाराबद्दल विनाकारण शंका घेऊ लागतात. या वाढत्या मानसिक समस्येला 'रिलेशनशिप ओसीडी' (Relationship OCD) किंवा 'रिलेशनशिप अँक्झायटी' असे म्हटले जाते.**

### संशयाच्या भोवऱ्यात प्रेम

या समस्येचे गांभीर्य समजून घेण्यासाठी २४ वर्षीय सोफियाचे उदाहरण पुरेसे आहे. गेल्या एका वर्षापासून ती प्रेमळ आणि आनंदी नात्यात आहे. तरीही तिच्या मनात सतत काही प्रश्न घोंगावत असतात. आपण खरोखरच एकमेकांसाठी योग्य आहोत का? मी त्याच्यावर खरंच प्रेम करते का? माझा निर्णय चुकीचा तर नाही ना? या विचारांनी तिच्या मनावर इतका ताबा मिळवला की, आपण नकळत आपल्या प्रियकराला फसवू तर नाही ना, अशीही भीती तिला वाटू लागली. हळूहळू ती घराबाहेर पडणे टाळू लागली, कामावर जाणेही बंद झाले. दिवसाचा बराच वेळ ती अंथरुणावरच घालवत असे. मनाला शांतता मिळावी म्हणून ती कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित चॅटबॉट 'चॅटजीपीटी'लाही वारंवार प्रश्न विचारू लागली.





### वाढती जागरूकता, वाढते निदान

गेल्या काही वर्षांत रिलेशनशिप ओसीडीची प्रकरणे अधिक प्रमाणात समोर येत आहेत. पूर्वी या समस्येविषयी फारशी माहिती नव्हती. मात्र सोशल मीडिया, मानसिक आरोग्याविषयी वाढलेली जागरूकता आणि माहितीच्या सहज उपलब्धतेमुळे आता अनेक जण आपल्या समस्येची ओळख करून घेत आहेत. परिणामी, योग्य समुपदेशन आणि उपचारासाठी पुढे येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. मानसिक आरोग्य तज्ज्ञांच्या मते, जोडीदाराविषयी अधूनमधून शंका येणे ही सामान्य बाब असू शकते. मात्र हे विचार सतत मन व्यापून राहत असतील, दैनंदिन आयुष्य, काम किंवा नातेसंबंधांवर त्याचा परिणाम होत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. अशा वेळी मानसोपचारतज्ज्ञ किंवा समुपदेशकांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. योग्य उपचार, समुपदेशन आणि भावनिक पाठबळामुळे ही समस्या नियंत्रणात आणता येऊ शकते.

### रिलेशनशिप ओसीडी म्हणजे नेमके काय?

सोफियाला ज्या मानसिक अवस्थेचा सामना करावा लागला, त्यालाच 'रिलेशनशिप ओसीडी' असे म्हणतात. हा ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव्ह डिसऑर्डर (OCD) चाच एक प्रकार आहे. या अवस्थेत व्यक्तीच्या मनात स्वतःच्या प्रेमसंबंधांविषयी सतत शंका निर्माण होत राहतात. या शंका इतक्या तीव्र होतात की त्यामुळे चिंता, भीती आणि अस्वस्थता वाढते. स्वतःची खात्री करून घेण्यासाठी संबंधित व्यक्ती जोडीदाराला वारंवार एकाच प्रकारचे प्रश्न विचारते किंवा त्याच्या वागणुकीची सतत परीक्षा घेत राहते. सोफियाच्या मते, हा अनुभव म्हणजे एक प्रकारची मानसिक छळवणूक आहे. कारण तिच्या मनात सतत अशी नकारात्मक विचारसाखळी सुरू असते, जी जोडीदारातील केवळ उणिवाच दाखवते आणि नात्यातील सकारात्मक बाजूंकडे दुर्लक्ष करते.

### रिलेशनशिप ओसीडीचे दोन प्रमुख प्रकार

- नात्याबद्दल संशय : या प्रकारात व्यक्तीला स्वतःच्या भावनांवरच विश्वास राहत नाही. आपण खरोखर प्रेम करतो का, हे नाते योग्य आहे का किंवा भविष्यासाठी हा निर्णय योग्य ठरेल का, असे प्रश्न सतत मनात येत राहतात.
- जोडीदाराबद्दल संशय : या प्रकारात व्यक्तीचे लक्ष सतत जोडीदाराच्या उणिवा, चुका किंवा कमतरतांकडेच केंद्रित राहते. जोडीदार योग्य आहे की नाही, याच विचारात ती सतत अडकून राहते आणि त्यामुळे नात्यात तणाव वाढतो.



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७९१७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## अंतिम मुदतीची वाट न पाहता पीक विमा योजनेत सहभागी व्हा -जिल्हाधिकारी कर्डिले

### ३१ जुलैपर्यंत नोंदणीची संधी; ग्राहक सेवा केंद्रात नोंदणी विनाशुल्क

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२६ अंतर्गत जिल्ह्यात पीक विमा नोंदणी सुरू असून, योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत आहे. अंतिम मुदतीस आता केवळ दोन दिवस शिल्लक असून, शेतकरी बांधवांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता तातडीने पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जिल्ह्यात आजअखेर ४ लाख ४२ हजार ४०६ शेतकऱ्यांनी एकूण ७ लाख ७७ हजार ४४२ पीक विमा अर्ज दाखल केले असून, ५ लाख ५ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा विमा उतरविण्यात आला आहे.

शेतकरी बांधवांनी आपल्या जवळील ग्राहक सेवा केंद्र, बँक अथवा पीक विमा पोर्टलवरील शेतकरी लॉगिनद्वारे स्वतःही पीक विमा नोंदणी करावी. ग्राहक सेवा केंद्रामध्ये पीक विमा नोंदणी विनाशुल्क केली जाते. त्यामुळे शेतकरी बांधवांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क ग्राहक सेवा केंद्र चालकास देऊ नये. तसेच सीएससी लॉगिनमधून नोंदणी करताना अडचण येत असल्यास शेतकऱ्यांनी पीक विमा पोर्टलवरील शेतकरी लॉगिनचा वापर करून नोंदणी करावी.



पीक विमा नोंदणीसाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी अनिवार्य असून, आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज सादर करावेत. तसेच विमा कंपनीचा सुधारित टोल फ्री क्रमांक १४४४७ असून, सर्व विमाधारक शेतकऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

यंदा जिल्ह्यात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला असून, अनेक भागांत अद्यापही समाधानकारक पावसाची आवश्यकता आहे. हवामान विभागाने पुढील कालावधीतही कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला असल्याने खरीप पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळसदृश परिस्थिती, रोग व किडीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळण्यासाठी पीक विमा अत्यंत महत्त्वाचा आहे.

३१ जुलै २०२६ नंतर पीक विमा नोंदणीस कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नसल्याने पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता तत्काळ पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## युरिया खताच्या बेकायदेशीर वाहतुकीवर धर्माबादमध्ये एकाच दिवशी दोन कारवाया

### दोन टेम्पोसह रु. १५.७० लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –शेतकऱ्यांसाठी शासनाकडून अनुदानावर उपलब्ध करून दिले जाणारे युरिया खत बेकायदेशीरपणे तेलंगणात पाठविण्याच्या प्रयत्नावर कृषी विभागाच्या जिल्हा भरारी पथकाने कारवाई केली. धर्माबाद येथे एकाच दिवशी करण्यात आलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये दोन टेम्पोसह एकूण १५ लाख ७० हजार ६०७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हा भरारी पथक प्रमुख तथा मोहीम अधिकारी सचिन कपाळे आणि पथक सचिव अमोल पेकम यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राखीव असलेला अनुदानित युरियाचा साठा विनापरवाना तेलंगणात पाठविला जात असल्याचे उघड झाले. त्यानुसार कृषी विभागाने सापळा रचून संशयित टेम्पो अडवला. कृषी अधिकारी (गुण नियंत्रण), धर्माबाद यांनी वाहनांची तपासणी केली असता कोणतीही वैध परवानगी किंवा आवश्यक कागदपत्रांशिवाय युरियाची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. पहिल्या कारवाईत ९ लाख ४० हजार ३८५, तर दुसऱ्या कारवाईत ६ लाख ३० हजार २९२ रुपये किमतीचा युरिया साठा व टेम्पो जप्त करण्यात आला.

कृषी विभागाचे गुण नियंत्रण निरीक्षक विशाल चंदापुरे यांच्या तक्रारीवरून संबंधित आरोपींविरुद्ध खत नियंत्रण आदेश, १९८५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमान्वये धर्माबाद पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांच्या हक्काचे अनुदानित खत काळ्या बाजारात व परराज्यात वळविण्याचे प्रकार रोखण्यासाठी कृषी विभागाने कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली असून, या प्रकरणातील इतर संबंधितांचा शोध पोलीस घेत आहेत.

ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, विभागीय कृषी सहसंचालक महेश तीर्थकर, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रवीण देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत आणि कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार एतवडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## घरफोडी करणारी टोळी गजाआड; इतवारा पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**–इतवारा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलिसांनी मोठी कारवाई करत डॉक्टरांच्या घरी चोरी करून ८ लाखांची रोकड चोरणाऱ्या टोळीला गजाआड केले.

शहरातील देगलूर नाका भागातून एका डॉक्टरच्या भाड्याच्या घरातून ८ लाख १२ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांच्या चोरांची टोळी इतवारा पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने गजाआड केली. तर चोरलेली रक्कमही जप्त केली असून, न्यायालयाने चोरट्यांना पोलीस कोठडीत पाठवले आहे.

यातील फिर्यादी डॉ. शेख शहवाज शेख जाफर वय ४०, रा. नौमानिया कॉलनी, चैतन्य नगर, तरोडा बु. येथील रहिवाशी आहेत. काही दिवसांपासून ते मदीना नगर, देगलूर नाका येथे भाड्याच्या घरात राहत आहेत. डॉक्टरांनी त्यांच्या वैद्यकीय व्यवसायातून आणि अपघात विम्यातून मिळालेली एकूण ८ लाख १२ हजार रुपये रोख रक्कम एका बॅगेत भरून पलंगाच्या बॉक्समध्ये ठेवली होती. २४ जुलै २०२६ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास आरोपींनी संगनमत करून ही रक्कम चोरून नेली. या प्रकरणी डॉ. शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून इतवारा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तातडीने तपास सुरू केला. यानंतर पिराजी बाळू वाघमारे, सुनील बाबूराव रॅपणवाड, सुनील चिमणाजी वाघमारे, साहेबराव पिराजी वाघमारे व तनुष्क गणपत मेटकर सर्व चिखलवाडी या पाच जणांच्या टोळीला गजाआड केले.

या प्रकरणाची नोंद २९ जुलै २०२६ रोजी पोलीस ठाण्यात करण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रवीण आगलावे, पोलीस अंमलदार रेवणनाथ कोळनुरे, साहेबराव जगताप, बंडू कलंदर, शेख इजरायल, मारोती गीते, हरप्रीतसिंघ सुखई, शेख शबाना यांनी ही कारवाई केली. यात चोरी केलेली रक्कम जप्त करण्यात आली.

## हुजूर साहिब नांदेड- तिरुचानुर- हुजूर साहिब नांदेड एक्सप्रेसमध्ये चार डब्यांची कायमस्वरूपी वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून गाडी क्रमांक १७६३३/१७६३४ हुजूर साहिब नांदेड- तिरुचानुर- हुजूर साहिब नांदेड एक्सप्रेसमध्ये कायमस्वरूपी अतिरिक्त डबे जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच या गाडीच्या रेक लिंकमध्येही सुधारणा करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत ही गाडी १८ डब्यांसह धावत असून, नव्या व्यवस्थेनुसार ती २२ डब्यांसह चालविण्यात येणार आहे. या वाढीमध्ये १ वातानुकूलित चेअर कार, २ वातानुकूलित तृतीय श्रेणी आणि १ शयनयान डब्यांचा समावेश करण्यात आला आहे.

ही सुधारित रचना हुजूर साहिब नांदेड येथून १ ऑगस्ट २०२६ पासून तर तिरुचानुर येथून २ ऑगस्ट २०२६ पासून लागू करण्यात येईल. डबेवाढीमुळे या मार्गावरील प्रवाशांना अधिक आसन व शयनयान उपलब्धता मिळणार असल्यामुळे प्रतीक्षा यादी कमी होण्यास मदत होईल. विशेषतः उत्तर भारताकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे. दक्षिण मध्य रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी सातत्याने पायाभूत सुविधा व गाड्यांच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी प्रयत्नशील असून, ही डबेवाढ त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

## लोह्यात आज महाराजस्व अभियान; आ. चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती



**लोहा (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोहा विधानसभा मतदारसंघाकरिता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार, दि. ३० जुलै रोजी के. के. मंगल कार्यालय शासकीय विश्रामगृह लोहा येथे संपन्न होणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी विलास नरवटे यांनी दिली.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे राहणार आहेत. तसेच उपविभागीय अधिकारी नरवटे, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, बीडीओ महेंद्र कुलकर्णी, कंधार बीडीओ पाटील, मुख्याधिकारी संदीप भोळे तसेच लोहा-कंधार तालुक्यातील सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

शासन निर्णयानुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय हे शिबीर आयोजित केले जात असून, महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करून शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. शिबिरामध्ये विविध सेवा व उपक्रमांचा लाभ नागरिकांना दिला जाणार आहे.

लोहा व कंधार तालुक्यातील सर्व नागरिकांनी गुरुवार, दि. ३० जुलै रोजी सकाळी १० वाजता के. के. मंगल कार्यालय, लोहा येथे उपस्थित राहावे. या महाशिबिराचा व विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी विलास नरवटे यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याची रक्कम तत्काळ जमा करा

### खा. रवींद्र चव्हाण यांचा आंदोलनाचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील ५७ हजारांहून अधिक शेतकरी पीक विम्यापासून वंचित आहेत. ७८.५१ कोटींचे दावे प्रलंबित, पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तत्काळ जमा करावी अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असा इशारा खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी दिला आहे.

पीक विम्याची रक्कम अद्यापही न मिळाल्याने खा. चव्हाण यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना (खरीप २०२५ सोयाबीन उत्पादन आधारित दावा) अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील हजारो शेतकरी आजही पीक विम्याच्या प्रतीक्षेत आहेत. उपलब्ध अधिकृत आकडेवारीनुसार जिल्ह्यातील १४ महसूल मंडळांतील ५७,०६४ शेतकऱ्यांचे ७८.५१ कोटींचे पीक विमा दावे अद्याप प्रलंबित असून, विमा वितरणासाठी आवश्यक असलेला राज्य शासनाचा हिस्सा न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना अद्याप एकही रुपया मिळालेला नाही.



या गंभीर प्रश्नावर खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी आक्रमक भूमिका घेत राज्य शासन, कृषी विभाग आणि संबंधित विमा कंपनीला जाब विचारला आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात मंजूर विम्याची रक्कम तातडीने जमा करावी, अन्यथा हा प्रश्न संसदेसह राज्य शासनाच्या स्तरावरही लावून धरू, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

अधिकृत अहवालानुसार जिल्ह्यातील ५७,०६४ शेतकऱ्यांनी ४१,०२३.७८ हेक्टर क्षेत्रासाठी विमा अर्ज केला होता. त्यापैकी ७८.८४ कोटींचा दावा मंजूर झाला असला, तरी आजपर्यंत प्रत्यक्षात कोणत्याही शेतकऱ्याच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही. तब्बल ७८.५१ कोटींचे दावे अद्याप प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे.

जेव्हा पात्र शेतकऱ्यांचे दावे मंजूर झाले आहेत, तेव्हा राज्य शासनाचा हिस्सा देण्यास विलंब का होत आहे, असा सवाल उपस्थित करून खा. रवींद्र चव्हाण यांनी हजारो शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीक विमा नेमका कधी मिळणार? शासनाने या विलंबामागील कारणे स्पष्ट करून तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली.

## संस्कृत विभागात गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)**– अभिनव भारत शिक्षण संस्था संचालित नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील संस्कृत विभागात बुधवार, दि. २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. संजय कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतात त्यांनी भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विशद केले. गुरु हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा शिल्पकार आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी गुरूंचा आदर, शिस्त, अध्ययनशीलता आणि संस्कार यांचा जीवनात अंगीकार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात गुरु पूजन करून गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गुरुपौर्णिमेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्कृत विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागोराव डांगे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – कंधार तालुक्यातील उस्माननगर येथील माजी सरपंच तथा सेवानिवृत्त सपोनि नागोराव संभाजी डांगे यांचे बुधवार, दि. २९ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. ३० जुलै रोजी सकाळी १० वाजता उस्माननगर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात बालाजी डागे, मारोती डांगे ही दोन मुले व दोन मुली, सुना, नात उपजिल्हाधिकारी सुप्रिया डांगे व पणतू असा परिवार आहे.

नांदेडच्या ऐतिहासिक वारशाला चालना

## शासनाकडून शरण सुरय्या वास्तूच्या विकासासाठी कार्यवाही

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील जुना गंज परिसरात असलेल्या बाराव्या शतकातील शरण सुरय्या यांच्या ऐतिहासिक निवासस्थानाच्या संरक्षण, संवर्धन आणि विकासासाठी महाराष्ट्र शासनाने सकारात्मक पाऊल उचलले आहे.

येथील नंदी फाऊंडेशन या संस्थेने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची शासन स्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यानुसार सांस्कृतिक कार्य विभागाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यासाठी स्थानिक पुराभिलेख विभागाला निर्देश दिले आहेत.

बाराव्या शतकातील शरण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शरण सुरय्या यांच्या वास्तव्यामुळे हे निवासस्थान ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्वाचे मानले जाते. या वारसास्थळाचे जतन व संवर्धन व्हावे, तसेच त्याचा विकास करून भावी पिढ्यांसाठी हा ऐतिहासिक ठेवा सुरक्षित राहावा, या उद्देशाने नंदी फाऊंडेशनने शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर केला होता. बाराव्या शतकात कर्नाटकातील महात्मा बसवेश्वरांचे समकालीन शरण बसवकल्याण येथील अनुभव मंटप या पहिल्या संसदेत प्रसादी (भोजन प्रमुख) होते.

शासनाने या प्रस्तावाची गंभीर दखल घेत संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिल्याने, या ऐतिहासिक वास्तूच्या संवर्धनाच्या प्रक्रियेला आता गती मिळण्याची अपेक्षा आहे.

## मटका आणि तिर्रट अड्ड्यांवरील छाप्यात २१ जण ताब्यात; दुचाकींसह ६ लाखांचा ऐवज जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याने मटका आणि तिर्रट जुगाराच्या दोन अड्ड्यांवर धडक कारवाई केली. या कारवाईत २१ आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी आणि जुगार साहित्यासह एकूण ६ लाख २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**पहिली कारवाई : हबीबिया कॉलनी, खुदबेनगर चौक**

दि. २८ जुलै रोजी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, हबीबिया कॉलनी, खुदबेनगर चौक येथे काही इसम 'कल्याण मटका' आणि बदक छाप पत्त्यांवर पैसे लावून जुगार खेळत आहेत. माहितीची खात्री करून पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण व पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला.

वाजिद खान रमजान खान, वय ३४, रा. उमर कॉलनी, देगलूर नाका, साजिद शहा मेहबूब शहा, वय ३३, रा. आफिजान नगर, मो. सुलेकर मो. युनूस, वय ४२, रा. मोबीनपुरा, पिरसाब सत्तार शेख, वय ५०, रा. उमर, ता. लोहा, शेख हबीब शेख शेरा, वय ४६, रा. खुदबेनगर, सय्यद मुसा सय्यद इसाक, वय ४१, रा. रहेमतनगर, मागसुद खान इसहाक खान, वय ४७, रा. खुसरोनगर, शेख मुजीब शेख खाजा, वय ३७, रा. गाडीपुरा, शेख अन्सार शेख अमीन, वय ५६, रा. इकबाल नगर, नासीर खान समशेर खान पठाण, वय ६४, रा. महेबूब नगर, नुरी चौक, शेख शकील शेख इस्माईल, वय ४६, रा. मदिना नगर, शेख शब्बीर शेख पाशा, वय ३५, रा. पाकिजानगर, मोहसीन खान रहीम खान, रा. नांदेड, अबू उर्फ जमीर, रा. नांदेड, शार्दुल उर्फ छिलटा, रा. नांदेड, मुजाहिद शेठ, रा. नांदेड यांना अटक केली. रोख १३ हजार, ९ मोबाईल ५९ हजार, मटक्याच्या चिठ्ठ्या, बदक छाप पत्ते व इतर साहित्य. एकूण ७२ हजार



मुद्देमाल जप्त करून नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे, गु.र.नं. ९२०/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दीक्षा नगर येथे दुसरी कारवाई**

दि. २८ जूलै २०२६ रोजी रात्री ११.२५ वाजता दीक्षानगर, बळीरामपूर येथील पाण्याच्या टाकीजवळ 'तिर्रट' हा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे व पथकाने छापा टाकून ५ जणांना ताब्यात घेतले.

तुषार विश्वंभर गजभारे (वय ३०, रा. धनेगाव), चंदर पिराजी गाडे, वय ३५, रा. बळीरामपूर, अमोल मधुकर आठवले (वय ३४ रा. नवीन कौठा), शिवाजी ज्ञानोबा दासरवाड, (वय ३१ रा. बळीरामपूर), राहुल हरीहरराव गवाले (वय ४६ रा. धनेगाव) रोख ४ हजार २०० रुपये, ५ मोबाईल ७९ हजार, ३ दुचाकी - होंडा शाईन, पॅशन प्रो व बुलेट ४ लाख ४५ हजार, बदक छाप पत्ते असा एकूण ५ लाख २८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे, गु.र.नं. ९१९/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि व्यंकट कुसमे, पोउपनि बाबुराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार शेख आसिफ, शिवानंद कानगुले, जेंकुट, कांबळे, बेग, जाधव, धम्मानंद कांबळे, देवडे यांनी पार पाडली. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी सांगितले की, जिल्ह्यात अवैध जुगार, मटका, सट्टा व इतर बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध कारवाई सातत्याने सुरू राहणार आहे. नागरिकांनी अशा प्रकारची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा पोलीस नियंत्रण कक्षाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com